
मंगळवार, १ नोव्हेंबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक १०४
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## सांगोल्याजवळ दिंडीत घुसली कार, सात वारकऱ्यांचा मृत्यू



**सांगोला :** कार्तिकी एकादशी यात्रेसाठी पंढरपूरकडे निघालेल्या दिंडीमध्ये कार घुसून सात वारकऱ्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी (दि. ३१) सांगोला तालुक्यातील जुनोनी येथे घडली. कोल्हापूर जिल्ह्याच्या करवीर तालुक्यातील जठारवाडी येथील काही भाविक कार्तिकी यात्रेसाठी पायी निघाले होते. सांगोला तालुक्यामधील जुनोनी गावाजवळ एका कारने दिंडीतील वारकऱ्यांना जोरदार धडक दिली. यामध्ये सात जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले आहेत. अपघाताचे वृत्त समजताच सांगोला पोलीस घटनास्थळी दाखले आणि त्यांनी पुढील कार्यवाही सुरू केली. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, या दुर्घटनेवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपये मदतीची घोषणा केली आहे.

### अंतरंग
‘राज्याच्या बदनामीचे कारस्थान यशस्वी होणार नाही’/२
जंजिरा किल्ल्यावर होणार जेटी आणि ब्रेकवॉटर/५
हॉटेल कर्मचाऱ्यांकडून रूमचे शुटिंग; विराटची नाराजी/८

# महाराष्ट्रातील पुण्यात साकारणार इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर

## केंद्र सरकारची मंजुरी; उपमुख्यमंत्र्यांनी मानले पंतप्रधानांचे आभार

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने महाराष्ट्रात इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर उभारण्यास मंजुरी दिली आहे. या प्रकल्पासह आगामी वर्षात राज्यात टेक्स्टाईल क्लस्टर उभारण्यात येणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. ३१) येथे पत्रकार परिषदेत दिली. याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभारही मानले आहेत.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजच केंद्र सरकारने राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स धोरणांतर्गत महाराष्ट्रासाठी इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टरची घोषणा केली आहे. आगामी काळात महाराष्ट्राला इलेक्ट्रॉनिक्स हब म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. भविष्यात सर्वाधिक गुंतवणूक आणि रोजगार हा इलेक्ट्रॉनिक्समध्ये आहे. त्यामुळे केंद्र सरकारने महाराष्ट्राला दिलेली ही एक भेटच आहे. याबद्दल मी केंद्र सरकारचे आभार मानतो. पुणे जिल्ह्यातील रांजणगाव एमआयडीसी येथे हे इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर साकारले जाणार आहे. त्या माध्यमातून सुमारे दोन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे पाच हजारांच्यावर रोजगार निर्माण होतील.



### क्लस्टर दृष्टिक्षेपात
- २९७.११ एकर जागेवर साकारणार
- ४९२.८५ कोटी पायाभूत सुविधांवर खर्च
- २०७.९८ कोटी केंद्र सरकार महाराष्ट्राला देणार
- २००० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार
- ५०००हून अधिक रोजगार निर्माण होणार
- ३२ महिन्यांत पूर्ण करण्याचे लक्ष्य

नवीन वर्षात महाराष्ट्राला केंद्र सरकारकडून टेक्स्टाईल पार्कदेखील मिळणार आहे. यातून महाराष्ट्रात टेक्स्टाईल पार्क उभे राहण्यास मदत होईल. याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. मी त्याची माहिती घेतली आहे. नवीन वर्षात अर्थसंकल्प सादर होईपर्यंत त्याची घोषणा होण्याची शक्यता आहे, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

आमचे सरकार येऊन फक्त तीन महिने झालेले आहेत. असे असताना महाराष्ट्रातून उद्योग जात आहेत, असे चित्र निर्माण केले जात आहे. त्यासाठी काही राजकीय पक्ष, त्यांची यंत्रणा यांनी मिळून महाराष्ट्राच्या बदनामीचा घाट घातला आहे. महाविकास आघाडीच्या कारकिर्दीत भयानक कांड झाले. त्यामुळे महाराष्ट्रात येण्यास कोणीही तयार नव्हते. गुंतवणूक करण्यास कोणीही तयार नव्हते. ही विस्कटलेली घडी व्यवस्थित करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

दरम्यान, या इलेक्ट्रॉनिक क्लस्टरबाबत केंद्रीय माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी सांगितले की, मागील दोन ते तीन महिन्यांपासून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या प्रकल्पासाठी पाठपुरावा करीत होते. त्यामुळे हा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. एखादा प्रकल्प दुसऱ्या राज्यात गेला असेल तर फार मोठा फरक पडणार नाही, परंतु या प्रकल्पामुळे हजारो, लाखो रोजगार निर्माण होणार आहेत.

### रिफायनरी प्रकल्प कुणी रोखला?

महाराष्ट्रातील प्रकल्प आणि बाहेर जाणारे प्रकल्प याबाबत चुकीचा नरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आमचे सरकार येऊन तीन महिनेच झाले आहेत. आतापर्यंतचे जे प्रकल्प राज्याबाहेर केले आहेत, त्या सर्वांना महाविकास आघाडीचे सरकारच जबाबदार आहे. महाराष्ट्रात येणारा गुंतवणुकीचा बाप म्हणजेच रिफायनरी प्रकल्प कुणी रोखला, असा थेट सवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी केला. गेल्या काही दिवसांपासून राज्याबाहेर जाणाऱ्या प्रकल्पावरून विरोधकांकडून सातत्याने होत असलेल्या टीकेचा उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी खरपूस समाचार घेतला. वेदांता फॉक्सकॉनपासून ते सेफ्रॉनपर्यंतचे प्रकल्प महाविकास आघाडीच्या काळातच कसे राज्याबाहेर गेले याचे पुरावे देत उपमुख्यमंत्र्यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. त्याचप्रमाणे रिफायनरी प्रकल्प महाराष्ट्रात साकारणार, असा ठाम निश्चय व्यक्त केला.

(छाया : जितू शिगवण)




# रायगडातील एकही प्रकल्प बाहेर गेलेला नाही : ना. सामंत

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील एकही प्रकल्प बाहेर गेलेला नाही. रायगडमधील चारही प्रकल्प रायगडातच होणार. बल्क ड्रग पार्क राज्य शासनामार्फत उभारण्यात येईल. जिल्ह्यात आणखी काही प्रकल्प आणण्याचा आमचा प्रयत्न आहे, अशी माहिती राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी (दि. ३१) येथे पत्रकार परिषदेत दिली.

रायगड जिल्ह्यातील जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारानंतर पालकमंत्री पत्रकारांशी बोलत होते. जिल्ह्यातील प्रकल्प रद्द झाले असा खोटा प्रचार करून काही लोक जनतेची दिशाभूल करीत आहेत. रायगडमधील प्रकल्प रायगडातच होणार. या प्रकल्पांमुळे जिल्ह्यातील तरुणांना रोजगार मिळणार आहे. त्यामुळे जनतेने हे प्रकल्प स्वीकारावेत. या प्रकल्पांना विरोध करू नये, असे आवाहन पालकमंत्र्यांनी या वेळी केले.

शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत आम्ही शेतकऱ्यांशी चर्चा करू. या प्रकल्पांमध्ये नोकरी देताना स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. स्थानिक पातळीवरच कुशल कामगार मिळावेत यासाठी कौशल्य विकास प्रकल्प राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, असे ना. सामंत यांनी सांगितले.

सध्या राज्यात खोटे बोलून तरुणांना भडकविण्याचे काम केले जात आहे. आम्हाला बदनाम करण्याचे काम सुरू आहे, पण आम्ही विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मात्र दिली जात नाहीत. वेदांत फॉक्सकॉन प्रकल्पप्रकरणी हायपॉवर कमिटीची बैठक का झाली नाही?, रायगडातील प्रकल्पांसंदर्भात कॅबिनेट सब कमिटीची बैठक का झाली नाही?, टाटा एअरबस प्रकल्पाबाबत मागच्या उद्योगमंत्र्यांनी एकतरी कागद दिला होता का? या प्रश्नांची उत्तरे आमच्यावर टीका करणाऱ्यांनी द्यावीत, असे आव्हान ना. सामंत यांनी दिले.

राज्यात काही नवीन प्रकल्प देण्याचे केंद्र सरकारने जाहीर केले आहे. १६०० कोटी रुपयांचे हे प्रकल्प आहेत. राज्यात जास्तीत जास्त प्रकल्प यावेत यासाठी आमचे सरकार प्रयत्न करणार आहे, असेही ना. सामंत यांनी सांगितले.

दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा संभ्रम दूर करण्याकरिता आपण स्वतः जाऊन त्यांची प्रत्यक्ष भेट घेत सविस्तर माहिती देणार असल्याचे सुतोवाच ना. सामंत यांनी केले. राज्यात प्रकल्प राहावेत यासाठी कोणते प्रयत्न आधीच्या सरकारकडून करण्यात आले होते, असा सवाल उपस्थित करीत तारखेनुसार अहवाल राज यांना देणार असल्याचेही सामंत यांनी सांगितले.

### निवडक

#### बलात्कार पीडितेवरील कौमार्य चाचणीवर बंदी

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने बलात्कार तसेच लैंगिक शोषणाच्या प्रकरणांमध्ये करण्यात येणाऱ्या कौमार्य चाचणीवर (टू फिंगर टेस्ट) बंदी घातली आहे. एका बलात्कार-हत्याप्रकरणी शिक्षा सुनावताना न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड आणि हिमा कोहली यांच्या खंडपीठाने हा निर्णय घेतला असून अशा प्रकारची चाचणी करणाऱ्यांना गैरवर्तनाच्या आरोपाखाली दोषी ठरविले जाईल, असे स्पष्ट केले आहे.

#### खासदार शरद पवार रुग्णालयात दाखल



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार प्रकृतीच्या कारणास्तव ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल झाले आहेत. पक्षाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार खासदार शरद पवार यांची प्रकृती ठीक नसल्याने ते डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ब्रीच कँडी रुग्णालयात पुढील तीन दिवस उपचार घेणार आहेत. २ नोव्हेंबरला त्यांना डिस्चार्ज देण्यात येईल.

### छट्पूजा





**पनवेल : वडाळे तलाव येथे सोमवारी छट् महापर्व पूजा आयोजित करण्यात आली होती. या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी छट्देवीची पूजा करून सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण केले तसेच उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासमवेत माजी नगरसेवक संतोष शेट्टी, नितीन पाटील, मनोज भुजबळ, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप शहर सरचिटणीस अमरीश मोकल, छट् महापर्व समितीचे विनय साद, विश्वनाथ साद, राजू ठाकूर, शंभू चौधरी, आलोककुमार, कुमार विभूती उपस्थित होते.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## सत्तासंघर्षावर आज सुनावणी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर मंगळवारी (दि. १) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या सुनावणीत आमदारांच्या पात्र-अपात्रतेबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडानंतर राज्यातील राजकारण पूर्णपणे ढवळून निघाले. शिवसेनेचे ४० आमदार शिंदे गटात दाखल झाले. त्यामुळे आमची शिवसेना हीच खरी शिवसेना, असा दावा शिंदे गटाकडून केला जातोय, तर ठाकरे गटाकडूनही खरी शिवसेना आमचीच असे म्हटले जात आहे.

खरी शिवसेना कुणाची यावर बराच खल सुरू आहे. ट्रकच्या ट्रक भरून पुरावे निवडणूक आयोगाकडे पाठविले जात आहेत, पण त्यापूर्वी आमदारांबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष आहे.

# शिंदे गटातील आमदार, खासदारांच्या सुरक्षेत वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटातील सर्व आमदार आणि खासदांना वाय दर्जाची सुरक्षा देण्याचा निर्णय राज्याच्या गृह विभागाने घेतला आहे. यामुळे शिंदे गटातील ४१ आमदार आणि १० खासदारांच्या सुरक्षेत वाढ होणार आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांना दिली जाणारी झेड प्लस दर्जाची सुरक्षा कायम ठेवण्यात आली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे, उद्धव ठाकरेंच्या पत्नी रश्मी ठाकरे, मुलगा तेजस आणि मुख्यमंत्री शिंदेचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांच्या वाय प्लस सुरक्षेत कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली असून त्यांना आता वाय प्लस सुरक्षा मिळणार आहे. याआधी त्यांना एक्स दर्जाची सुरक्षा दिली जात होती.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजार यांना झेड दर्जाची सुरक्षा कायम ठेवण्यात आली आहे. जस्टीस के. यु. चांदिवाल यांची सुरक्षा काढण्यात आली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना ताफ्यासहित वाय प्लस दर्जाची सुरक्षा देण्यात आली आहे. अंबानी कुटुंबाला झेड प्लस सुरक्षा देण्यात आली असून बॉलीवूड अभिनेता सलमान खानला वाय प्लस सुरक्षा पुरवण्यात येणार आहे.

# लेफ्टनंट ऑफिसर ऋचा दरेकरवर अभिनंदनाचा वर्षाव

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगडची कन्या ऋचा कृष्णकांत दरेकर हिची भारतीय लष्करात लेफ्टनंट ऑफिसर म्हणून नियुक्ती झाली आहे. याबद्दल तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ऋचाने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवल्याची भावना व्यक्त होत आहे.

मूळची पळसदरी येथील रहिवासी असलेली ऋचा हिचे आठवीपर्यंतचे शिक्षण खोपोली येथील शिशुमंदिरमध्ये झाले, तर आठवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण तिने पनवेल येथील बार्न्स हायस्कूलमध्ये घेतले. मग रसायनी येथील पिल्लई कॉलेजमधून ऋचाने इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन या शाखेतून इंजिनियरिंगची पदवी प्राप्त केली. त्याचप्रमाणे घाटकोपर येथील आर. जे. झुनझुनवाला कॉलेजमध्ये एम्टेकची पदवी घेतली. त्यानंतर तिने टीडीएसचीही परीक्षा दिली. या परीक्षेतून तिची निवड झाली आणि बंगळुरूला सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड परीक्षेत यश मिळविल्यावर चेन्नई येथे ऑफिसर अकॅडमीत ट्रेनिंग सुरू झाले. या कॅडेटची पासिंग आऊट परेड होऊन भारतीय सैन्यदलात लेफ्टनंट ऑफिसर या पदावर ऋचाची नियुक्ती झाली.

ऋचाचे वडील व्यावसायिक आहेत, तर आई वकिली करते. दोन वर्षे लॉकडाऊन काळात घरी असताना काहीतरी आव्हानात्मक कामगिरी करावी असे ठरवून ऋचाने सैन्यदलात जाण्याचा निर्णय घेतला आणि हे स्वप्न पूर्ण करून दाखविले आहे. ऋचाने अत्यंत वेगळे क्षेत्र निवडून कठोर प्रयत्नांतून यश संपादन केले आहे. यासाठी तिने कोणताही क्लास किंवा ट्रेनिंग घेतले नव्हते. लेफ्टनंट ऑफिसर म्हणून नियुक्त झाल्याबद्दल सर्वत्र तिचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

### रायगडच्या शिरपेचात मानाचा तुरा



#### २६व्या वर्षी सैन्यदलात बहुमान

ऋचा दरेकरने रायगड जिल्ह्यातून पहिली महिला लेफ्टनंट ऑफिसर बनण्याचा बहुमान पटकाविला आहे. अवघ्या २६व्या वर्षी तिने ही कामगिरी केली आहे. ऋचाने तलवारबाजी खेळात जिल्हा व राज्यस्तरावर सुवर्णपदके मिळवली असून ती राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूही आहे.

## टी-२० वर्ल्डकपनंतर टीम इंडियाला नवा कर्णधार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेनंतर होणाऱ्या बांगलादेश आणि न्यूझीलंड दौऱ्यासाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. निवड समितीने न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी शिखर धवनची कर्णधारपदी नियुक्ती केली आहे, तर हार्दिक पांड्या टी-२० मालिकेसाठी कर्णधार असणार आहे.

बांगलादेशविरुद्धच्या वनडे आणि कसोटी मालिकेसाठी रोहित शर्माकडे कर्णधारपद असेल. दोन्ही देशांच्या मालिकांसाठी संघात काही नव्या खेळाडूंना संघात संधी देण्यात आली आहे. रोहितसह लोकेश राहुल आणि विराट कोहलीला न्यूझीलंड मालिकेतून विश्रांती देण्यात आली आहे, तर संजू सॅमसनचे या मालिकेसाठी पुनरागमन झाले आहे, मात्र त्याला बांगलादेश दौऱ्यातून वगळण्यात आलेय. उमरान मलिका आणि शाहबाज अहमद यांना संघात संधी देण्यात आली आहे. दीपक चहर बांगलादेश दौऱ्यावर परतणार आहे, पण जसप्रीत बुमराहचे अद्याप पुनरागमन झाले नाही.

# गुजरातमधील पूल दुर्घटनेस तरुणांची हुल्लडबाजी कारणीभूत?

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

गुजरातमधील मोरबी येथील मच्छू नदीवर असलेला १०० वर्षे जुना झुलता पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत १३२ जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर संपूर्ण देशभरातून शोक व्यक्त होत आहे. दरम्यान, पूल कोसळतानाचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून यामध्ये काही तरुण पुलावर उड्या मारताना दिसत आहेत. या हुल्लडबाजीमुळेच दुर्घटना झाल्याचा दावा काही साक्षीदार करीत आहेत.

सीसीटीव्हीत पुलावर तरुणांची गर्दी असल्याचे दिसत आहे. या वेळी काही तरुण फोटोशूट करीत असताना त्यांच्या पुढे उभे असणारे तरुण पुलावर उड्या मारताना दिसत आहे. यादरम्यान पूल हालत असल्याचेही व्हिडीओत स्पष्ट दिसत आहे. यानंतर काही वेळातच पूल कोसळतो आणि सर्वजण खाली नदीत पडतात. हा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

दरम्यान, पूल दुर्घटनेप्रकरणी कारवाईस सुरुवात झाली असून या पुलाचे नूतनीकरण करणाऱ्या कंपनीच्या मॅनेजरसह नऊ जणांना अटक करण्यात आली आहे.

### व्हिडीओ व्हायरल



या दुर्घटनेबद्दल केवाडिया येथे बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तीव्र दुःख व्यक्त केले. ते मंगळवारी (दि. १) घटनास्थळी जाणार आहेत.

# ‘त्या’ सर्वांची चौकशी एकदम ओक्के!

## ■ आशिष शेलारांचा कॅग चौकशीवरून उद्धव ठाकरेंना टोला

**मुंबई : प्रतिनिधी**

कोरोनाच्या काळात सामान्य मुंबईकर जीव कसा वाचेल, या भीतीत होता, तेव्हा कंत्राटदार आणि तत्कालीन सत्ताधारी लोक खिसा भरण्यात मग्न होते. माजले होते बोके, कोरोना काळात खाऊन खोके, त्या सर्वांची चौकशी एकदम ओके, अशी टीका मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरेंवर केली आहे.



मुंबई पालिकेने कोरोना काळात लोकांची गैरसोय होऊ नये, यासाठी टेंडर प्रक्रिया न राबवता तातडीने सोयीसुविधा उभारण्यास आणि वस्तूंची खरेदी करण्यास प्राधान्य दिले होते, मात्र यामध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप भाजपकडून करण्यात येत होता. या सर्व प्रकरणांची चौकशी कॅगकडून चौकशी करण्यात येणार आहे. यावरून आशिष शेलार यांनी महाविकास आघाडी आणि उद्धव ठाकरेंवर घणाघाती आरोप केले आहेत. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

मुंबई पालिकेत दुराचार आणि भ्रष्टाचाराचे पेव माजलं आहे, त्याला थांबवले पाहिजे, यासाठी आम्ही विधानसभेत प्रश्न मांडले. त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅगद्वारे चौकशीचे विधानसभेत आश्वासन दिले होते. त्यानुसार २८ नोव्हेंबर २०१९ ते २८ फेब्रवारी २०२२ या कालावधीमध्ये १० वेगवेगळ्या विभागात १२ हजार १३ कोटी रुपयांच्या कामांच्या कॅग चौकशीचे मुख्यमंत्री शिंदेंनी आदेश दिले आहेत, असे आशिष शेलार यांनी सांगितले.

राज्यातून प्रकल्प गुजरातला गेले, यावरून आमदार आदित्य ठाकरे सतत सरकारवर टीका करीत आहेत. त्यावर महाराष्ट्राला अडीच वर्षात मागे नेण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने केले.

तीनही प्रकल्पांच्या भूमिपूजनाचे फोटो अथवा करसवलतीचा करार सवलत यांनी दाखवावा. एकही प्रकल्प राज्यात आलाच नाहीतर, गेलाच कसा. महाराष्ट्र मागे राहिला याचे कारण उद्धव ठाकरे आहेत. निष्क्रीय सरकार आणि निष्पाप जनता हे चित्र अडीच वर्षात होते. हे चित्र आता बदलले आहे, अशी टीका शेलार यांनी उद्धव ठाकरेंवर केली आहे.

**या प्रकल्पांची चौकशी होणार**

१. कोरोना काळातील खर्च -३,५३८ कोटी
२. दहिसर-अजमेरा भूखंड खरेदी -३३९ कोटी
३. मुंबईतील चार पुलांचे बांधकाम -१,०९६ कोटी
४. तीन कोविड रुग्णांलयातील खर्च -९०४ कोटी
५. मुंबईतील ५६ रस्त्यांची दुरुस्ती -२,२८६ कोटी
६. सहा सांडपाणी प्रकल्प -१,०८४ कोटी
७. घनकचरा व्यवस्थापन -१,०२० कोटी
८. तीन मलःनिसरण प्रक्रिया केंद्र -१,१८७ कोटी

# राज्याच्या बदनामीचे कारस्थान यशस्वी होणार नाही -बावनकुळे

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स धोरणांतर्गत महाराष्ट्राला इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर मंजूर करून राज्याला मोठी भेट दिल्याबद्दल आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो, अशी प्रतिक्रिया भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी (दि. ३१) व्यक्त केली.



शिंदे-फडणवीस सरकारच्या नेतृत्वात राज्यात येणारी गुंतवणूक रोखण्यासाठी राज्याची बदनामी करण्याचे महाविकास आघाडीचे कारस्थान कधीही यशस्वी होणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या केंद्र सरकारने राज्यात इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर मंजूर केल्यामुळे २००० कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असून ५००० रोजगार निर्मिती होईल. राज्यात शिंदे-फडणवीस सरकारमुळे पुन्हा एकदा गुंतवणुकीस अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. आगामी काळात राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होऊन महाराष्ट्र देशातील पहिल्या क्रमांकाचे गुंतवणूक आकर्षित करणारे राज्य ठरेल, असा आपल्याला ठाम विश्वास आहे.

त्यांनी सांगितले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात गेल्या अडीच वर्षात वसुलीमुळे आणि टक्केवारीमुळे राज्यात नवी गुंतवणूक येणे अवघड झाले. उलट राज्यात प्रस्तावित असलेले मोठे प्रकल्प अन्यत्र गेले. तथापि, आता शिंदे फडणवीस सरकारच्या बुलेट ट्रेनच्या वेगाने कामामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येण्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्याबरोबर महाविकास आघाडीचे नेते त्यांच्या अपयशाचे खापर नव्या सरकारवर फोडून खोट्याचा नॅरेटीव्ह चालवत आहेत.

महाराष्ट्रात उद्योग येऊच नये यासाठी तर महाविकास आघाडीकडून ही बदनामीची मोहीम चालवली जात आहे, असा आरोप करून ते म्हणाले की, खोट्याचा नॅरेटीव्ह चालविण्याची ही मोहीम कधीही यशस्वी होणार नाही. भाजप-बाळासाहेबांची शिवसेना युती सरकार राज्याला गुंतवणुकीत पुन्हा पहिल्या क्रमांकावर आणेल, असेही त्यांनी सांगितले.

## सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विशेष टपाल पाकिटाचे अनावरण

**मुंबई : प्रतिनिधी**

लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांचे देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आणि देशाची एकात्मता साधण्यात महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या जयंतीदिनी त्यांच्या कार्यास समर्पित करणारे विशेष टपाल पाकीटाचे अनावरण बिर्ला हाऊस या ऐतिहासिक वास्तूत करणे हे अभिमानास्पद असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १४७व्या जयंतीनिमित्त आणि एकता दिनानिमित्त भारतीय टपाल विभाग आणि बिर्ला समूहाच्यावतीने विशेष टपाल पाकिटाचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बिरला हाऊस येथे सोमवारी (दि. ३१) झाले. या वेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, महात्मा गांधी आणि लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल या महान व्यक्तीचे वास्तव्य बिर्ला हाऊसमध्ये होते. या ऐतिहासिक वास्तूत लोहपुरूष सरदार पटेल यांच्या कार्यास समर्पित करणारे टपाल पाकिटाचे अनावरण करणे ही अभिमानास्पद बाब आहे.

अखंडता आणि एकात्मतेचा संदेश देणाऱ्या लोहपुरूषाच्या कार्याला स्मरण करून, त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यातील सर्व वर्गातील लोकांचा विकास करण्याच्या दृष्टीने विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत. जनतेच्या सहकार्याने शासन कार्य करीत असून, जनतेला भविष्यात विकासात्मक बदल दिसेल.

पोस्टमास्टर जनरल स्वाती पांडे म्हणाल्या की, राष्ट्रीय एकता दिवसाचे औचित्य साधून लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्यास समर्पित विशेष पाकीटाच्या दोन हजार प्रती छापण्यात आल्या आहेत. यापूर्वी सरदार वल्लभभाई पटेल यांचे टपाल तिकीट भारतीय टपाल विभागाने प्रसिद्ध केले आहे.

या कार्यक्रमास खासदार श्रीकांत शिंदे, धैर्यशील माने, भारतीय टपाल विभागाच्या पोस्टमास्टर जनरल स्वाती पांडे, सहायक निदेशक स्मिता राणे, यश बिर्ला समूहाचे अध्यक्ष यशवर्धन बिर्ला, पत्नी अवंती बिर्ला यांच्यासह बिर्ला कुटुंबिय, भारतीय डाक विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# आजारपणाला वैतागलेल्या वृद्धाची आत्महत्या

**पनवेल : वार्ताहर**

आजारपणाला वैतागलेल्या एका ६९ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने १२व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना खारघर सेक्टर ३५ डी मध्ये घडली आहे. रमेशकुमार बालकृष्णन इल्लन असे त्यांचे नाव आहे.

रमेशकुमार हे पनवेलमध्ये राहात होते. मागील काही वर्षांपासून ते आजारपणामुळे त्रस्त होते. त्यांनी वेगवेगळे उपचार केले, मात्र त्यांचा त्रास कमी होत नव्हता. त्यामुळे या आजारपणाला ते कंटाळले होते. रमेशकुमार हे खारघर सेक्टर ३५डी मधील गोकुळधाम सोसायटीत बहिणीकडे तिच्या वाढदिवसानिमित्त आले होते. रात्री बहिणीच्या घरी थांबल्यानंतर सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास रमेशकुमार यांनी या इमारतीच्या १२व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन रमेशकुमार यांचा मृतदेह ताब्यात घेतला.

रमेशकुमार यांनी आत्महत्येपूर्वी लिहून ठेवलेली चिठ्ठी या वेळी पोलिसांच्या हाती लागली असून, त्यात त्यांनी आजारपणाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे म्हटले आहे.

# भाजीचा टेम्पो असल्याचे भासवून गुटख्याची वाहतूक

## चालक जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

भाजीचा टेम्पो असल्याचे भासवून भिवंडी पनवेल येथे नेला जाणारा १० लाख १५ हजार रुपये प्रतिबंधित गुटख्याचा साठा नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाने सापळा रचून पकडला. या कारवाईत टेम्पो चालकाला अटक करून टेम्पो जप्त करण्यात आला आहे.

नवी मुंबई परिसरात गुटख्याचा साठा वितरित करण्यासाठी भिवंडी मुंब्रा-पनवेल मार्गावरून पनवेल येथे एक टेम्पो जाणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्या आधारे पथकाने मुंब्रा-पनवेल मार्गावरील धानसर टोल नाका येथे सापळा लावला होता. दरम्यान येथे संशयित टेम्पो आला असता हा टेम्पो भाजीचा असल्याचे भासवण्यासाठी बाहेरील बाजूस भाजीचे प्लास्टिक क्रेट ठेवण्यात आले. या पथकाने टेम्पोची तपासणी असता, आत १० लाख १५ रुपये किमतीच्या गुटख्याने भरलेल्या गोणी आढळून आल्या. पथकाने टेम्पोसह गुटख्याचा साठा व २९ प्लास्टिक क्रेट असा एकूण १७ लाख २८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी टेम्पोचालक मोहम्मद नदीम शौकतअली खान (३२) याच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असूनअटक करण्यात आली आहे. हा गुटखा वासिम ऊर्फ साबिर खान, जयराम ऊर्फ मुस्तकिम, रफू, सद्दाम, जावेद, शंकर कुमार हे सर्वजण गुजरात व इतर राज्यातून आणत असल्याचे समोर आले आहे.

# स्नेहकुंज वृद्धाश्रमाला दिवाळी अंकांची भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी यांच्या वाढदिवसानिमित्त नेरेपाडा येथील स्नेहकुंज आधारगृह या वृद्धाश्रमाला महाराष्ट्रातून प्रसिद्ध होणारे वेगवेगळे दिवाळी अंक भेट देण्यात आले.

या वेळी ज्येष्ठ साहित्यिक रायगडभूषण प्रा. एल. बी. पाटील, कवयित्री सुनिता रामचंद्र, आधारगृहचे संचालक संगीता जोशी, नितीन जोशी, कवी रामदास गायधने, योगिनी वैदू, विलास पुंडले उपस्थित होते.

महाराष्ट्रातील दिवाळी अंकांची परंपरा यातून साहित्य संस्कृती, दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेल्या वेगवेगळ्या साहित्याचे वाचन व्हावे हा उद्देश या अंक भेट देण्यामागचा असल्याचे गणेश कोळी यांनी सांगितले.



# पालकमंत्र्यांच्या जनता दरबाराला उत्तम प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

पालकमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी (दि. ३१) घेतलेल्या जनता दरबाराला जिल्हा भरातून चांगला प्रतिसाद मिळाला. जवळपास २५७ नागरिकांनी आपल्या तक्रारी या जनता दरबारात मांडल्या.




अलिबागच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात आयोजित या जनता दरबाराला आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे सीईओ डॉ. किरण पाटील यांच्यासह सर्व खात्यांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या वेळी उदय सामंत यांनी तक्रारदारांचे म्हणणे ऐकून त्यांचे निराकरण होण्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला, त्यांच्या नोकरीचे प्रलंबित प्रश्न, रखडलेल्या पाणीपुरवठा योजना, मुंबई-गोवा महामार्ग आदी सार्वजनिक प्रश्नांवर लवकरच बैठक बोलावण्याचे आश्वासन संबंधिताना दिले. येणाऱ्या प्रत्येक तक्रारदाराचे म्हणणे ऐकून घेवून त्याचे समाधान होईपर्यंत त्यांच्याशी संवाद साधला.

# उरणमध्ये ताप, डेंग्यू रुग्णांमध्ये वाढ

**उरण** : वातावरणातील बदलामुळे व डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे सध्या उरण तालुक्यात ताप, सर्दी, खोकला, काविळ आणि डेंग्यूचे रुग्ण आढळून येत आहेत. वातावरणात मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. यामुळे अनेकांना आजारांनी ग्रासले आहे.


**इमारतीच्या पुनर्विकासासाठी निविदा मागविणेबाबत नोटीस**

१) पारसमणी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, फायनल प्लॉट क्रमांक ११९/३,हरिओमनगर जवळ,पनवेल,ता.पनवेल, जिल्हा रायगड, या संस्थेने इमारतीच्या पुनर्विकासाचा निर्णय घेतला असून संस्थेने नियुक्त केलेल्या वास्तुविशारदानी याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सदर प्रकल्प अहवालाची संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे दिनांक ०२/११/२०२२ ते दिनांक ०५/११/२०२२ या कालावधीत सकाळी १०-०० ते दुपारी ३-०० या वेळेत या इमारतींच्या पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक याना पाहणी करता येईल, व त्याआधारे पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक यांचेकडून दिनांक ०५/११/२०२२ ते दिनांक ०९/११/२०२२ या कालावधीत सकाळी १०-०० ते दुपारी ३-०० या वेळेत आपल्या निविदा संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे जमा कराव्यात. तसेच निविदा हया कमीत कमी रकमेला प्राधान्य अशा स्वरुपाच्या नसून सभासदाना योग्य वाटेल त्या विकासकाच्या निविदेची निवड सर्वसाधारण सभेत करण्यात येईल. निविदा मंजूर किंवा नामंजूर करणेबाबतचा अधिकार सर्वस्वी संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा असेल,त्याबाबत कोणतेही कारण देण्यास संस्था बांधील नाही.

सही/- सही/- सही/-
चेअरमन सेक्रेटरी ट्रेझरर
पारसमणी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.
नोंदणी क्र. आरजीडी/पीडब्ल्युएल/एचएसजी/(टिसी)/१४४६/सन १९९६, दि. ११/०७/१९९६,
फायनल प्लॉट क्रमांक ११९/३,हरिओम नगर जवळ,पनवेल,ता.पनवेल, जिल्हा रायगड,



**जाहीर नोटीस**

**मोटार अपघात दावा न्यायधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**अर्ज क्रमांक : ८०४/२०२२**

**मोह.अखलाक मोह.इशाक अंसारी आणि इतर १** — **अर्जदार**
**विरूद्ध**
**मनखेचा परागभाई कन्हैय्यालाल** — **विरूद्ध पक्षकार**
**आणि**
**आयसीआयसी लोबांर्ड जनरल इश्युरन्स कं.लि.** — **विमाकार**

**प्रति,**
**मनखेचा परागभाई कन्हैय्यालाल**
**पत्ता-** रुम नं. १०१, बी विंग,
माथेरान रोड, सिद्धी अपार्टमेंट,
साई समर्थ हॉटेल समोर, सुखापुर पनवेल.
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **२९-११-२०२२** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **अध्यक्ष सचिन बी. मुंडे** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक **१२-१०-२०२२** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
प्रबंधक
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१


# एकता दौडच्या माध्यमातून एकात्मतेचा संदेश

**नवी मुंबई : बातमीदार**

लोहपुरुष सरदार वल्लभभाई यांच्या जयंतीदिनानिमित्त संपूर्ण देशभरात एकता दिन साजरा करण्यात येत असून त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने एकात्मतेचा संदेश देत एकता दौड हा अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला होता.




श्री करियर अकॅडमी यांच्या सहयोगाने ज्वेल ऑफ नवी मुंबई ते महापालिका मुख्यालय येथे एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. या एकता दौडमध्ये ३००हून अधिक युवकांनी उत्साहाने सहभागी होत देशभक्तीपर घोषणा देत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश प्रसारित केला. जुहू चौपाटी वाशी येथे लेट्स सेलिब्रेट फिटनेस या संस्थेच्या सहयोगाने संस्थाप्रमुख रिचा समित यांच्यासह १२५हून अधिक नागरिक दौडमध्ये सहभागी झाले. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे आणि वाशी विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त दत्तात्रय घनवट यांनी या दौडचे नियोजन केले.

याशिवाय शिक्षण विभागाचे उपायुक्त योगेश कडुसकर आणि शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांच्या नियंत्रणाखाली महानगरपालिकेच्या शाळांमध्येही एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते.


यामध्ये ३० प्राथमिक व २३ माध्यमिक शाळांमधील ५०००हून अधिक विद्यार्थ्यांनी आपापल्या शाळांच्या परिसरात एकता दौडच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश प्रसारित केला.

नवी मुंबईकर नागरिकांनी या उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होत सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन करीत राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविले.

## दुखवटा

### तुळसाबाई पाटील

**पनवेल** : ज्येष्ठ पत्रकार माधव बाबू पाटील यांच्या मातोश्री तुळसाबाई बाबू पाटील यांचे रविवारी (दि. ३०) अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९३ वर्षांच्या होत्या.



तुळसाबाई प्रेमळ आणि हसतमुख स्वभावाने परिचित होत्या. तुळसाबाई यांच्या पार्थिवावर बामणडोंगरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा होमविधी मंगळवारी (दि. १) बामणडोंगरी येथे, दशक्रिया विधी ८ नोव्हेंबर रोजी श्रीक्षेत्र लांगेश्वर मोरावे येथे, तर उत्तरकार्य ११ नोव्हेंबरला बामणडोंगरी येथे होणार आहे.

# पनवेल परिसरात छट्पूजेचा उत्साह










**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाच्या अनेक भागांमध्ये सूर्य उपासनेचा सर्वांत मोठा सण छट्पूजा साजरा केला जातो. आपली संस्कृती, श्रद्धा निसर्गाशी किती खोलवर जोडलेली आहे याचा पुरावा म्हणजे सूर्यपूजेची परंपरा आहे. त्यानिमित्त पनवेल शहरातील वडाळे तलाव, खांदेश्वर येथील तलाव आणि नवीन पनवेल येथील आदई तलावाजवळ छट्पुजेचे आयोजन सोमवारी (दि. ३१) करण्यात आले होते. या पुजेला भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले आणि जल अर्पण केले. नवीन पनवेल येथील आदई तलाव



येथे रविवारीदेखील छट्पूजा झाली. शहरात विविध तलावांच्या ठिकाणी महापालिकेच्या वतीने सभा मंडप उभे करण्यात आले होते.

छट्पुजेनिमित्त आदई तलाव येथे आयोजित कार्यक्रमावेळी माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, ॲड. मनोज भुजबळ, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, शिवाजी भगत, विवेक होन, अक्षय सिंह, कुलबीर चांदोक, रीमा रावल, छठ पूजा सेवा ट्रस्ट नवीन पनवेलचे बी. पी. सिंग, जितेंद्र तिवारी, सुनील सिन्हा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष कोकाटे, किशोर सिंग, तानाजी खंडागळे आदी उपस्थित होते.

खांदेश्वर तलाव येथे आयोजित छट्पूजेवेळी माजी उपमहापौर सीताताई पाटील, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, युवा मोर्चा अध्यक्ष अभिषेक भोपी, प्रभाग क्रमांक १५ अध्यक्ष शांताराम महाडीक, रामनाथ पाटील, प्रेमा भोपी, आयोजक अवधेश शुक्ला, अनुपम शर्मा, भद्र शेट्टी, गजानन साळवी, विजय यादव, मनिषा पाटील उपस्थित होते.

वडाळे तलाव येथे आयोजित छट्पुजेला माजी नगरसेवक नितीन पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीतम म्हात्रे, विनय साह, विश्वनाथ साह, राजू ठाकूर, शंभू चौधरी, अलोक कुमार मंडळ, कुमार विभुटी आदी उपस्थित होते.





**खारघर : येथील सेक्टर १४, १५, ३४, ३५ या ठिकाणी छट्पूजेचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरेश केणी, प्रवीण पाटील, उत्तर भारतीय प्रकोष्ठ अध्यक्ष विनोद ठाकूर, युवा मोर्चा माजी जिल्हा सरचिटणीस समीर कदम, जिल्हा सचिव गीता चौधरी, खारघर तळोजा मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष विनोद घरत आदी उपस्थित होते.** (छाया : योगेश पाटील)





**उलवे नोड : सेक्टर २३ येथे छट्पूजा उत्साहात साजरी करण्यात आली. आयोजक भाजप उलवे नोड उपाध्यक्ष कैलास मिश्रा यांच्यासह उत्तर भारतीय बांधव तसेच भाजपचे अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.**



**पनवेल : भारताचे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त भाजप मध्यवर्ती कार्यालयात सोमवारी अभिवादन करण्यात आले. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ कार्यकर्ते अजय कांडपिळे, अशोक साळुंखे, कांचन पालकर, अण्णा पालकर, सतेंद्र पालकर, शाम पवार, सुभाष मुकादम आदी उपस्थित होते.**
(छाया : संकेत भोईर)



**कळंबोली : येथील रोडपाली, खिडूकपाडा या परिसरात छट्पूजेचा उत्साह सुरू आहे. यात सहभागी होणाऱ्या भाविकांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते फळांचे वाटप करण्यात आले. माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा, अमर पाटील यांच्या वतीने फळवाटप उपक्रम राबविण्यात आला. या वेळी पोलीस उपनिरीक्षक दिनेश पाटील, डी. एन. मिश्रा, मजीबुल आलम शाह, आबा घुटुकडे, देविदास खेडकर, विलास किटे, आमोल राठोड, प्रवीण मिश्रा, संजीव सिंग, मनोरंजन सिंग, कृष्णा सिंग, संजय सिंग, संतोष सिंग आदी उपस्थित होते.**

# शेडुंग येथे सोसायटीच्या कार्यालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शेडुंग येथील जय मल्हार सोसायटीच्या कार्यालयाचे उद्घाटन रविवारी (दि. ३०) भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी बिल्डर गजानन खबाळे, माजी सरपंच व कामगार सेलचे महाराष्ट्र प्रदेश सचिव सुभाष जेठू पाटील, युवा नेते योगेश लहाने, सदस्य मोहन दुर्गे, रामदास खेत्री, शांताराम दुर्गे, ज्ञानेश्वर पाटील, सुनील पाटील, रवी दुर्गे, गजानन दुर्गे, जय मल्हार सोसायटीचे रहिवासी नरेंद्र देसाई, अमोल मगर, तानाजी सावंत, संतोष गायकवाड, श्रीरंग बेलकर, विकास पाटील, कृष्णराव जगदाळे, किरण नाईकवाडे, आशिष धनवडे, विनोद शिंदे, नामदेव साळवी, अरुण देसाई, लक्ष्मण झोरे, महेश केदारे, संदीप पाटील, संतोष पाटील, विकी गवाणे तसेच शेडुंग गावचे विशाल पाटील, सुधाकर पाटील,



प्रकाश खेत्री, रामदास दुर्गे, आत्माराम लबडे, प्रतिक खेत्री, पांडुरंग दुर्गे, कृष्णा दुर्गे, पुंडलिक दुबे आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाषणात जुने, नवीन असा कोणताही भेदभाव केला जाणार नाही तसेच सोसायटीच्या नागरिकांचा पाण्याचा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन दिले.

# जासई हायस्कूलमध्ये राष्ट्रीय एकता दिन साजरा

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजच्या शैक्षणिक संकुलात सोमवारी (दि. ३१) राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, कामगार नेते सुरेश पाटील यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक आणि रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग यांनी केले.

या वेळी राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली. विद्यार्थ्यांमार्फत राष्ट्रीय एकता रॅलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी हातात फलक घेऊन राष्ट्रीय एकात्मतेवर घोषणा देऊन रॅली काढली. या कार्यक्रमासाठी रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नूरा शेख, विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका एस. एस. पाटील, गुरुकुल प्रमुख जी. आर. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेजचे सर्व प्राध्यापक वर्ग तसेच माध्यमिक विभागाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी माजी सरपंच धिरज घरत, ग्रामविस्तार अधिकारी पालकर, ग्रामपंचायत सदस्य मनीषा घरत, पूजा कांबळे, पौर्णिमा कांबळे व इतर शिक्षण प्रेमी नागरिक उपस्थित होते.



# दुर्गदर्शन सोहळ्याची दीपोत्सवाने सांगता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळीनिमित्त राजे शिवराय प्रतिष्ठान यांच्या वतीने नवीन पनवेल येथे श्री सिंधुदुर्ग किल्ल्याची भव्य प्रतिकृती उभारण्या आली होती. या दुर्गदर्शन सोहळ्यात विविध उपक्रम प्रतिष्ठानकडून राबविण्यात आले. या सोहळ्याची रविवारी (दि. ३०) दीपोत्सवाने सांगता करण्यात आली.

जनमानसात इतिहासाविषयी जागरूकता निर्माण व्हावी तसेच गडकोटांप्रति आदरभाव निर्माण व्हावा या उद्देशाने प्रतिष्ठान मागील १६वर्षे सातत्याने पुणे तसेच पनवेल येथे कार्य करीत आहे. पनवेल विभागाचे संघटक संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. किल्ला अभ्यास मोहिमेपासून ते किल्ला उभारणीपर्यंत पनवेल विभागाच्या सर्व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. प्रेम, ओंकार, चैतन्य, पार्थ, श्रेयस, मंदार, अजय, प्रसाद, पायल, सूरज, संग्राम, शुभम, कल्पेश यांनी सतत १० दिवस पावसाचे आव्हान स्वीकारत काम करून किल्ला प्रतिकृती पूर्ण केली.



दगड माती विटा वापरून हा किल्ला बनविला.

अभ्यास मोहिमेदरम्यान किल्ल्याचा इतिहास समजून फोटोग्राफी करण्यात आली त्यानंतर किल्ल्याची मोजणी करून गुगलच्या साहाय्याने मॅप तयार करण्यात आला. जमिनीवर स्केल टाकून नंतर बांधणीला सुरुवात केली. या प्रक्रियेदरम्यान मुलांना किल्ल्याचा इतिहास आणि त्याचे महत्त्व समजावले जाते. याचबरोबर टीम बिल्डींग, टीम वर्क, कम्युनिकेशन स्किल, प्लॅनिंग या पद्धतीचे व्यक्तिमत्व विकासाचे धडे दिले जातात

या प्रतिकृतीच्या दुर्ग दर्शन सोहळ्याचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते २३ ऑक्टोबरला झाले होते. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून हिंदू राष्ट्र सेनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय देसाई, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सहसंघाचालक प्रशांत कोळी तसेच राजे शिवराय प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश पवळे उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी राजे शिवराय प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा देत सर्वतोपरी मदत करण्याचे सांगितले. धनंजय देसाई यांनी हिंदू म्हणून एकत्र येण्याची गरज आहे, असे मत व्यक्त केले. राजे शिवराय प्रतिष्ठान शाखा पनवेलच्या उपक्रमाचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. दुर्गसंवर्धन करणाऱ्या संस्थांचा धनंजय देसाई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सोहळ्याचे कार्यक्रम प्रमुख धनेश नीचीत हे होते. सूत्रसंचालन संकेत भोसले यांनी तर आभार केतन गुरव यांनी मानले.

दरम्यान, ३० ऑक्टोबरपर्यंत ही प्रतिकृती पाहण्यासाठी खुली ठेवण्यात आली होती. २८ ऑक्टोबर रोजी स्त्रीशक्ती संघटन या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमांतर्गत आई भवानीची ओटी भरणे तसेच हळदीकुंकू हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास स्थानिक मातृशक्तीचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. ३० ऑक्टोबर रोजी या दुर्गदर्शन सोहळ्याच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी दीपोत्सव साजरा करून सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## वृद्ध महिलेच्या नातेवाइकांचा शोध

**पनवेल** : रेल्वे स्टेशनवर रोहा-दिवा शटल मेमो गाडीमध्ये बेशुद्ध अवस्थेत एक अज्ञात वृद्ध महिला आढळली असून त्या महिलेच्या नातेवाइकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस घेत आहेत.

वृद्ध महिलेचे अंदाजे वय ६५ असून उंची पाच फूट पाच इंच, अंगाने मध्यम, रंग गोरा, चेहरा उभट, केस लाल पांढरे आहे. तसेच अंगात लाल ब्लाऊज व सफेद साडी घातलेली आहे. तिला उपचारार्थ पनवेल उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आलेले आहे. तेथे महिलेला ॲडमिट करण्यात आले असून या महिलेच्या नातेवाइकांबाबत कोणाला माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे ०२२२७४६७१२२ किंवा मोबाइल क्रमांक ८३५६०४४५३८ यावर संपर्क साधावा, असे पनवेल रेल्वे पोलिसांकडून आवाहन करण्यात आले आहे.

## सिडकोमध्ये दक्षता जनजागृती सप्ताह

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

केंद्रीय दक्षता आयोगाच्या निर्देशांनुसार दरवर्षीप्रमाणे सिडको महामंडळामध्ये ३१ ऑक्टोबर २०२२ ते ६ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सिडको मुख्यालयासह सिडकोची नोड्ल कार्यालये, नवीन शहर कार्यालये येथे हा सप्ताह राबविण्यात येणार आहे. भ्रष्टाचार मुक्त भारत – विकसित भारत ही या वर्षीच्या दक्षता जनजागृती सप्ताहाची संकल्पना आहे.

सप्ताहा दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सिडको एमडी डॉ. संजय मुखर्जी यांनी सोमवारी (दि. ३१) अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सत्यनिष्ठेची शपथ दिली. या कार्यक्रमास श्री. अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक, डॉ. कैलास शिंदे, डॉ. शशीकांत महावरकर, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष विनोद पाटील, विभागप्रमुख व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संपादकीय

# ‘फेक नॅरेटिव्ह’चे प्रयोग!

मोठमोठे औद्योगिक प्रकल्प महाराष्ट्रातून पळवून नेले जात आहेत असा अपप्रचार सध्या होत आहे. ‘खोटे बोल पण रेटून बोल’ या नव्या म्हणीनुसार विरोधी पक्षांचे काही असंतुष्ट नेते, हाताशी धरलेले मोजके मीडियाकर्मी आणि काही हितशत्रूंनी शिंदे-फडणवीस सरकारविरोधात जो खोटा प्रचार चालवला आहे, तो दुर्दैवी म्हटला पाहिजे.

**वेदांत-फॉक्सकॉन सेमी-कंडक्टर प्रकल्प महाराष्ट्रात येता-येता गुजरातमधील ढोलेरा येथे गेला. टाटा आणि एअरबस यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु होणारा वाहतुकीच्या विमानांच्या निर्मितीचा कारखाना गुजरातेतील बडोद्याला गेला. रायगड जिल्ह्यात होऊ घातलेला बल्क ड्रग पार्कचा महाप्रकल्पही महाराष्ट्रात आलाच नाही. सॅफ्रन कंपनीचा प्रकल्पही अन्य राज्यात गेला. वरील तीन-चार ओळी सलग वाचल्या की काहीतरी भयंकर प्रकार महाराष्ट्राबाबत घडतो आहे, असा कोणाचाही ग्रह होईल, परंतु यात तथ्य नाही, ही वस्तूस्थिती आहे. ‘शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे’ हा नवा पक्ष आणि त्यांच्यासोबत महाविकास आघाडीत साथीदार असलेल्या इतर दोन पक्षांच्या नेत्यांनी मात्र हे तथ्य गुंडाळून ठेवून निराळेच कारस्थान सुरु केल्याचे दिसते. हे कारस्थान आहे, महाराष्ट्राच्या बदनामीचे. या कारस्थानाचा पर्दाफाश सोमवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्रकार परिषदेत झाला. वेदांत-फॉक्सकॉन प्रकल्प महाराष्ट्रात होणार नाही, हे तत्कालीन उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी तेव्हाच स्पष्ट केले होते, हे फडणवीस यांनी पुराव्यानिशी दाखवून दिले. टाटा-एअरबस प्रकल्पासाठी विरोधी पक्षनेता असूनही आपण स्वत: प्रयत्न केले होते, पण ‘गुंतवणुकीसाठी राज्यातील वातावरण ठीक नाही’ असे प्रकल्पकर्त्यांतर्फे स्पष्ट करण्यात आले, असा गौप्यस्फोटही यावेळी फडणवीस यांनी केला. जे प्रकल्प महाराष्ट्रात येणारच नव्हते, ते इथे यावेत, यासाठी महाविकास आघाडी सरकारने ढिम्म हालचाल केली नाही, मात्र त्यावरून एक ‘फेक नॅरेटिव्ह’ (खोटा प्रचार) तयार करण्यात येत आहे आणि त्यासाठी माध्यमांतील मोजक्या ‘एचएमव्ही’ पत्रकारांना हाताशी धरण्यात आल्याचा गंभीर आरोप फडणवीस यांनी केला. फडणवीस यांच्यासारखा नेता हातात पुरावे असल्याशिवाय काहीही बोलत नसतो, याचे भान विरोधकांनी ठेवायला हवे. ते जेव्हा आरोप करतात, तेव्हा तेव्हा संबंधितांना तुरुंगाची हवा खावी लागली आहे, हे उभा महाराष्ट्र जाणतो. फडणवीस यांच्या पत्रकार परिषदेत हिमनगाचे टोक तेवढे दिसले आहे. शिंदे-फडणवीस सरकारला ‘फेक नॅरेटिव्ह’च्या जोरावर कोंडीत पकडता येणार नाही. अतिशय खालच्या पातळीवरील राजकारणामुळे आणि भ्रष्ट कारभारामुळे महाराष्ट्राची अडीच वर्षे अक्षरश: वाया गेली. या काळात झालेले महाराष्ट्राचे नुकसान भरून काढण्यासाठी शिंदे-फडणवीस सरकारला शर्थीचे प्रयत्न करावे लागत आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या काळात झालेला भ्रष्टाचार खणून काढण्याची तयारी आता नव्या सरकारने सुरु केली आहे. कोरोनाकाळात या सरकारने भरमसाठ खर्च करून हजारो कोटींची संशयास्पद कामे केली. त्याची यादीच भाजपचे नेते आशिष शेलार यांनी जाहीर केली असून देशाच्या महालेखापालांकरवी (कॅग) त्याची छाननी होणार आहे. कॅगच्या अहवालात आता भलभलती भुते बाहेर येण्याची शक्यता निर्माण झाल्यानेच महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. हे ‘फेक नॅरेटिव्ह’चे कारस्थान त्यामुळेच सुरू आहे, असे वाटते. फडणवीस यांच्या आरोपांना उत्तरे देणे हे ‘शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे’ पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांच्या ताकदीच्या बाहेरचे काम आहे, हेदेखील आता उघड झाले आहे.**

# महाडचे सावित्री नदीपात्र होतेय गाळमुक्त!

## खबरबात
**महेश शिंदे**



महाड शहरांत २२ जुलै २०२१ रोजी सावित्री नदीला आलेल्या महापुराचे पाणी शहरात शिरल्याने नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले. दरवर्षी येणाऱ्या पुराच्या पाण्यापेक्षा या वेळी आलेले पुराच्या पाण्याचे प्रमाण प्रचंड होते. न भुतो न भविष्यति असा आलेला हा महापूर महाडकरांचे कबंरडेच मोडून गेला. हजारो कोटींचे नुकसान झाले. लोक देशोधडीला लागले. हजारो नागरिकांना कित्येक दिवस आपले संसार उघड्यावर मांडावे लागले होते. पाण्याने काहीच बाकी ठेवले नाही. ना कपडे, ना पैसे, ना पाणी, ना जेवण, ना वाहने असे बहुआयामी नुकसान करणारी ही आपत्ती होती.

भविष्यामध्ये महाड शहरावर पुराचे संकट येऊ नये याकरिता महाड पूर नियंत्रण समिती स्थापण्यात आली. समितीमधील तज्ज्ञांनी सावित्री नदीला येणाऱ्या पुरामागील कारणांचा अभ्यास केला तेव्हा काही गोष्टी प्रकर्षाने पुढे आल्या. काही तासांत कोसळणारा प्रचंड पाऊस आणि त्याच पाणी समुद्रात वाहून नेण्यासाठी सावित्रीचे पात्र कमी पडत आहे. सावित्रीमध्ये गाळ साचल्याने पात्र उथळ झाले आहे, तसेच दासगाव गोठे हा कोकण रेल्वेचा पूलही या पुरास कारणीभूत आहे हे समोर आले. सह्याद्रीमधून येणारे हजारो क्युसेक पाणी हे धरणांच्या माध्यमातून अडविले पाहिजे व यासाठी धरणांची निर्मिती होणे गरजेचे होते. यासाठी महाडकरांना संघर्ष करावा लागला, मोर्चा काढावा लागला. तत्काळ करण्यात येणारे काम म्हणजे सावित्रीमधील गाळ काढणे. यासाठी फेब्रुवारी ते मे २०२२मध्ये सावित्रीमध्ये अत्यावश्यक नावाखाली उत्खनन करण्यात आले. यासाठी ठेकेदाराला हजारो कोटींचे बिल अदा करण्यात आले तर वाळूमाफीयांनी याच संधीचा फायदा घेत आपल्या पिशव्या भरल्या.

या वर्षी पावसाळा संपल्यानंतर पुन्हा एकदा समितीकडून सूचवण्यात आलेले उपाय अमलात आणण्याचे काम राज्य शासनाकडून सुरू करण्यात आले आहेत. यापैकी सावित्री नदीतील गाळ काढण्याच्या कामाचा शुभारंभ नुकताच करण्यात आला असून यामुळे पूर नियंत्रणात येईल, महाड शहर पुराच्या पाण्यापासून कायमचे मुक्त होईल, असा विश्वास महाड पूर नियंत्रण समितीचे अध्यक्ष डॉ. समीर बुटाला, समिती सदस्य नितीन पावले, संजय मेहता, प्रकाश पोळ व अन्य सदस्यांनी व्यक्त केला, मात्र हे जरी खरे असले तरी अभ्यास न करता गाळ काढणे आणि जुड्डे काढल्याने भविष्यात सावित्रीचे पात्र आपला मार्ग बदलू शकते. अशा वेळी मोठी हानी टाळता येत नाही व असा अहवाल दस्तुरखुद्द पाटबंधारे विभागाने दिला होता, तसेच वारेमाप होणाऱ्या या उत्खननात हजारो लाखो ब्रास वाळू निघणार आहे. यावर वाळूमाफीया डल्ला मारण्याचे नाकारता येत नाही.

महाडमध्ये २२ जुलै २०२१ रोजी आलेल्या प्रलयंकारी महापुरामुळे महाडकरांचे प्रचंड नुकसान झाले. अशा प्रकारचा पूर पुन्हा येऊ नये याकरिता शासन स्तरावर योग्य ते उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी स्थानिकांसह लोकप्रतिनिधींनी राज्य शासनाकडे वारंवार केली, अखेर त्यांच्या मागणीला यश आले. त्यानंतर आमदार भरत गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली महाड पूर नियंत्रण समितीने विशेष प्रयत्न केल्यामुळे शासकीय यंत्रणेकडून नदीतील गाळ काढण्यास परवानगी देण्यात आली. समितीने पूर येण्याची कारणे व त्यावर कोणते उपाय त्वरित करणे आवश्यक आहे, याचा सखोल अभ्यास केला. त्याच प्रमाणे तज्ज्ञांकडून नदीची पाहणी करण्यात आली, अशी माहिती समिती सदस्य नितीन पावले यांनी दिली.

सर्वप्रथम सावित्री नदीतील गाळ काढण्यात यावा तसेच काही ठिकाणी नदीचे पात्र रुंद करण्यात यावे अशी मागणी समितीने केली होती. सर्वांत मोठा अडथळा दासगाव येथील कोकण रेल्वेपुलाचा आहे, पुलाच्या बांधकामामुळे शहरात पाणी येत असल्याचे मत समिती सदस्यांनी व्यक्त केले आहे. मागील वर्षी नदीतील काही भागातून गाळ काढण्यात आला. त्याचा परिणाम म्हणून या वर्षी महाड शहरात येणाऱ्या पुराच्या पाण्यावर नियंत्रण आले. समितीच्या मागणीवरून या वर्षी केंबुली गावापासून महाडपर्यंत सावित्री नदीपात्रांतून गाळ काढण्याचे काम सुरू करण्यात आले असल्याचे समिती सदस्यांनी सांगितले.

# गेले ते दिवस, उरल्या फक्त आठवणी...

सण व उत्सव साजरे करणे म्हणजे भारतीय संस्कृतीचा एक भाग आहे. पूर्वी सण जवळ येत असताना सर्व वस्तूंची जमवाजमव करून ठेवावी लागत असे. पोळा, दिवाळी यांसारखे सण मोठ्या उत्साहात, आपुलकीने, प्रेमाने साजरे होत असत. दिवाळीच्या सणात तर नातेवाईकांची रेलचेल बघावयास मिळत असे. आता काळ बदलला आहे, कोणीही नातेवाईकांच्या घरी जाण्याची तसदी घेत नाही. आपुलकीची माणसे हरवली आहेत.

सणानिमित्त गोड-धोड पदार्थ बनविण्यासाठी शेजारच्या आजी, काकू हातावरील चकल्या तयार करण्यासाठी एकमेकांच्या घरी जात असे. आपुलकीचा गोडवा वाटत होता. त्यानिमित्ताने सुसंवाद घडून येत होता, पण सध्या कोणालाही एकमेकांच्या घरी जाऊन मदत करावे असं वाटत नाही. ज्वारी, गहू, तांदूळ बारीक करायचे असताना कांडणी करतांना किंवा जात्यावर ज्वारी दळताना ओव्या म्हणत होत्या. तो एक लोककलेचा भाग होता पण ते देखील कालबाह्य होतांना दिसत आहे म्हणून गेले ते दिवस, उरल्या त्या फक्त आठवणी हे अगदी खरे आहे.

भारत देश तसा खेड्यातच वसलेला आहे. संपूर्ण खेडे म्हणजे एक कुटुंब याप्रमाणे वागत होते, पण सध्याची परिस्थिती लक्षात घेता शेजारच्या घरी कार्यक्रम झाला तरी माहिती होत नाही. गावातील प्रमुख व्यवसाय म्हणजे शेती होय. शेती करून कुटुंबाची गुजराण करीत असतात व उरलेले धान्य विकून संसाराचा गाडा हाकत असतात. शेतीची अवजारे वा कामे मिळून-मिसळून करीत असत. विदर्भात धान रोवणीपासून तर कापणीपर्यंत धानाचे डिबले केल्यावर खळे करण्याची धामधूम राहत असे. अगदी थंडीच्या दिवसात धानमळणी करण्यासाठी बैलगाडीला बैलाला जुंपून रात्रभर फिरवून धान अलग केल्या जात होते. त्यावेळी लहान मुलांना येणारी मजा मात्र हिरावली आहे. हिवाळ्यात जेवण आटोपल्यावर आजूबाजूच्या लेकरं, स्त्रिया एकत्र येऊन शेकोटी पेटवत असायचे. शेकोटीजवळ बसून शेतीविषयीच्या गोष्टी केल्या जात होत्या. मनोरंजनाच्या साधनांची अनुपलब्धता असल्याने सुसंवाद, सहकार्य अधिक चांगल्या प्रकारे चालत होते. आता त्या आठवणीच उरल्या आहेत असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.

गावात असताना मुले मैदानी खेळात रममाण असायचे. मौजमस्ती, खेळातील भांडण नेहमीचेच असायचे. चिंचोके, विटीदांडू, कापडी बॉल, झाडावरून उड्या मारणे, लपाछपी, टायर चालविणे यासारख्या खेळातून शारीरिक व मानसिक संतुलन टिकून राहत होते, पण आजची मुले तंत्रज्ञानाच्या युगात अडकली आहेत. मोबाइलच्या आभासी दुनियेमुळे शारीरिक तर सोडाच पण मानसिक संतुलन बिघडण्यास कारणीभूत ठरत आहेत. मोठेही एकत्र असले तरी त्यांच्यात सुसंवाद न होता आपापल्या मोबाइलमध्ये व्यस्त असतात. आता वाहतुकीची साधने वाढली असली तरी आपुलकीने बोलण्यासाठी वेळ नाही ही शोकांतिका वाटते आहे.

**-दुशांत बाबुराव निमकर, चंद्रपूर**

## बदलते तंत्रज्ञान

# फोन पे आणि गुगल पेवर आता लागणार शुल्क?




सध्या यूपीआय (युनिफाइड पेमेंट इंटरफेस) पेमेंटसाठी सरकार किंवा बँकांकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही, परंतु आता या यूपीआय पेमेंटवर शुक्ल आकारण्याची शक्यता आहे. याचे कारण, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे काही नियम आहेत. त्या नियमानुसार मोफत यूपीआय पेमेंटसाठी शुल्क आकारणे गरजेचे आहे. त्यामुळे यूपीआय पेमेंटबाबत नवीन नियम बनवले जाऊ शकतात. त्याचे व्यवस्थापन कसे करायचे हा बँकांसमोरचा मोठा प्रश्न आहे.

बचत खात्यातून पैसे काढण्यासाठी आरबीआयने बँकांवर काही मर्यादा घातल्या आहेत. त्यामुळे बँकांना आता मोफत यूपीआयच्या नियमानुसार अडचणी येत आहेत. दर महिन्याला किंवा दरवर्षी ग्राहकांसाठी बँकांमधून पैसे काढण्यासाठी व्यवहारांवर मर्यादा आहेत. ज्या मर्यादा यूपीआय व्यवहारांवर नाहीत. जर आरबीआयने यूपीआय पेमेंटचा खर्च उचलला तर ही समस्या दूर होऊ शकते. आरबीआय चलन छापण्यासाठी जसा खर्च उचलते, त्याच पद्धतीने यूपीआय पेमेंट व्यवहारांचा खर्च उचलला तर बँकांसाठी ते सोपे होऊ शकते. आयआयटी बॉम्बेचे आशिष दास यांच्या म्हणण्यानुसार, काही बँकांनी बचत खात्यातून पैसे काढण्यासाठी मर्यादा घातली आहे जसे की इंडियन ओव्हरसीज बँकेने आपल्या ग्राहकांना बचत खात्यातून सहा महिन्यांत ५० विनामूल्य डेबिट व्यवहारांची सुविधा दिली आहे. दुसरीकडे कॅनरा बँकेने आपल्या मूलभूत बचत खात्यात एका महिन्यात चार विनामूल्य डेबिट व्यवहारांची सुविधा दिली आहे.

आरबीआयने यूपीआय पेमेंट्स अमर्यादित ठेवल्या आहेत आणि त्यांच्यावर सध्या शुल्क आकारले जात नाही, परंतु बँकांना डेबिट व्यवहारांवर मर्यादा घालण्याची परवानगी आहे. म्हणजेच बँका व्यवहारांवर मर्यादा ठेवू शकतात. सध्या देशात जास्त प्रमाणात यूपीआय चा वापर वाढला आहे. त्यामुळे आरबीआयने यूपीआय पेमेंटवर शुल्क आकारले तर बँका आणि आरबीआय यांच्यात संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

# शाकाहार करा, निरोगी आयुष्य जगा!

## निमित्त



जागतिक शाकाहारी दिवस हा दर १ नोव्हेंबर रोजी जगभरातील शाकाहारी लोकांद्वारे साजरा केला जाणारा वार्षिक कार्यक्रम आहे. मनुष्यांसाठी शाकाहारी असण्याचे फायदे आणि नैसर्गिक वातावरण याबाबत माहितीपर स्टॉल्स लावणे, स्मारक, झाडे लावणे यांसारख्या उपक्रमांद्वारे हा दिवस साजरा केला जातो. १९९४मध्ये युनायटेड किंग्डममधील व्हेगन सोसायटीचे तत्कालीन अध्यक्ष लुईस वॉलिस यांनी संस्थेच्या स्थापनेच्या ५०व्या वर्धापन दिनानिमित्त आणि शाकाहारी व शाकाहार या शब्दांच्या स्मरणार्थ या कार्यक्रमाची स्थापना केली होती.

दुग्धजन्य पदार्थ आणि प्राणी उत्पादने वगळून सर्व-हरित आहार स्वीकारण्याची प्रथा साजरा करण्याचा हा दिवस आहे. जागतिक शाकाहारी दिनानिमित्त लोकांना शाकाहारी जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. काही उल्लेखनीय शाकाहारी लोकांच्या मते, शाकाहारी जीवनशैली मानवी आरोग्य वाढवते, प्राण्यांच्या आरोग्याचे रक्षण करते आणि पर्यावरण संरक्षणात मदत करते. २०२२साली जागतिक शाकाहारी दिवसाला ७८ वर्षे पूर्ण होत आहेत.

जागतिक शाकाहारी दिनानिमित्त लोकांना शाकाहारी जीवनशैली अंगिकारण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. शाकाहारी असणे हा निरोगी जीवन जगण्याचा मार्ग आहे जो कोणीही स्वीकारू शकतो. शाकाहारी आहाराचे अनेक आरोग्य फायदे आहेत. शाकाहारी आहाराच्या आरोग्याच्या फायद्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्याचा प्रचार करण्यासाठी जागतिक शाकाहारी दिवस साजरा केला जातो. शाकाहारी जीवनशैलीचे फायदे आणि तोटे समजून घेतल्यास एखाद्याला शाकाहारी आहार घेण्यास मदत होऊ शकते.

जागतिक शाकाहारी दिवस जगभरात विविध प्रकारे साजरा केला जातो. लहान-मोठ्या प्रमाणात कार्निव्हल, पाककला उत्सव आणि सार्वजनिक मेळावे आहेत. लोकांना सामील व्हावे असे वाटावे यासाठी भागधारकांनी २०२१साठी बरीच तयारी केली आहे.

महागाईने ग्रासलेल्या या जगात, स्वस्त शाकाहारी खाद्यपदार्थांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी व्हेगन सोसायटीची ‘लिव्ह व्हेगन फॉर लेस’ मोहीम ही एक विलक्षण संकल्पना आहे. शाकाहारी असल्याने तुम्ही वजन झपाट्याने कमी करू शकता. शाकाहारी अन्न वजन कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. दररोज संतुलित प्रमाणात फळे, भाज्या, संपूर्ण धान्य इत्यादींचे सेवन केल्याने, आपण वजन कमी करण्याचे आपले लक्ष्य जलद साध्य करू शकता. शाकाहारी आहारामुळे टाईप २ मधुमेहावर आराम मिळू शकतो. शाकाहारी आहारात भाज्या, फळे आणि धान्ये जास्त प्रमाणात वापरली जातात, ज्यात फायबर भरपूर प्रमाणात असते आणि त्यात असलेली नैसर्गिक साखर रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करते.


व्हेगन फूडदेखील तुमच्या हृदयासाठी खूप चांगले आहे. फळे आणि भाज्यांचे नियमित सेवन केल्याने वाईट कोलेस्ट्रॉल दूर होण्यास मदत होते.

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : छट्पुजेनिमित्त नवीन पनवेल येथील आदई तलावावर सोमवारी सूर्योदयापूर्वी शेकडोंच्या संख्येने उत्तर भारतीय महिला पूजा करण्यासाठी उपस्थित होत्या.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## आरोग्य प्रहर



# गाढ झोप लागण्यासाठी ‘हे’ उपाय ठरतील उपयुक्त

उत्तम आरोग्यासाठी पुरेशी झोप मिळणे आवश्यक असते. रोजच्या प्रवासाची दगदग, कामाचा ताण यामध्ये पुरेशी झोप न मिळणे साहजिक आहे, तर काही जण झोपेत मध्येच जाग येण्याच्या समस्येने त्रस्त असतात. अशा व्यक्तींना गाढ झोप लागत नाही, त्यामुळे सकाळी उठल्यावर झोप पूर्ण न झाल्याचे जाणवते. यामुळे थकवादेखील जाणवू शकतो. दिवसभरातील कामे करण्यासाठी शरीराला ऊर्जेची गरज असते आणि त्यासाठी पुरेशी झोप मिळणे आवश्यक असते. जर तुम्हाला गाढ झोप लागत नसेल, तर यावर काही सोपे उपाय करता येतील. कोणते आहेत ते उपाय जाणून घ्या.

रात्री लवकर झोपण्याची सवय लावा : झोप पूर्ण व्हावी यासाठी रात्री लवकर झोपावे हा सल्ला नेहमी दिला जातो कारण हे शरीराला वेळेवर झोपण्याची सवय लागावी यासाठी महत्त्वाचे आहे. जर तुम्हाला गाढ झोप लागत नसेल तर तुम्ही स्वतःला लवकर झोपण्याची सवय लावण्याचा प्रयत्न करा.

झोपण्यापूर्वी मोबाइल, लॅपटॉप अशा उपकरणांचा वापर टाळा : झोपण्यापूर्वी सोशल मीडिया सर्फिंग, ओटीटी प्लॅटफॉर्म्सवरील बिंज वॉच या गोष्टी करण्याची अनेकांना सवय असते, पण जास्त वेळ स्क्रिन पाहिल्याने झोपेवर त्याचा परिणाम होतो. हे गाढ झोप न लागण्याचे कारण असू शकते. त्यामुळे झोपण्यापूर्वी शक्य तितका वेळ मोबाइल, लॅपटॉप अशा उपकरणांपासून लांब रहा. याऐवजी तुम्ही पुस्तक वाचू शकता किंवा कुटुंबासोबत वेळ घालवू शकता. यामुळे दिवसभरातील ताण कमी होण्यास मदत मिळते.

आरामदायी अंथरूण निवडा : आपण ज्या गादीवर झोपतो त्या गादीच्या प्रकाराचा, उशीचादेखील झोपेवर परिणाम होतो. त्यामुळे आरामदायी अंथरून निवडा, ज्यामुळे झोपेत व्यत्यय येणार नाही. तसेच तुम्ही ज्या खोलीत झोपता तिथल्या लाईटचा आणि आजूबाजूच्या आवाजाचादेखील झोपेवर परिणाम होतो.

# जंजिरा किल्ल्यावर होणार जेटी व ब्रेकवॉटर



**मुरुड : प्रतिनिधी**

जंजिरा किल्ल्याच्या पश्चिमेकडे पर्यटकांना सुरक्षित उतरण्यासाठी भव्य जेटी उभारण्यात येणार असून समुद्राच्या लाटांचा प्रभाव कमी करण्यासाठी २५० फूट लांबीचा ब्रेकवॉटर (भिंत) बांधण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी प्रसार माध्यमांना दिली.

शिवरायांपासून चर्चेत असणारा अभेद्य जंजिरा किल्ला पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे. शिडाच्या बोटीने गेल्यावर किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर उतरणे व चढणे पर्यटकांसाठी मोठे कठीण होते. समुद्राच्या लाटांचा मारा होत असताना बोट १० फूट वर जाऊन काही सेकंदात खाली येते. त्यावेळी पर्यटकांना जीव मुठीत घेऊन उतरावे लागत होते. ते सुरक्षित नसल्याने किल्ल्यावर अद्यावत जेटी असावी, अशी मागणी होत होती. पुरातत्व खात्याच्या अनेक परिक्षणानंतर किल्ल्याच्या पश्चिमेकडे जेटी बनवण्याची परवानगी मिळाली. तेथे ९३.५६ कोटी खर्चून ५०० पर्यटक सुरक्षित उतरतील अशी भव्य जेटी आणि समुद्राच्या लाटांचा प्रभाव कमी करण्यासाठी २५० फूट लांबीचा ब्रेकवॉटर (भिंत) उभारण्यात येणार आहे, असे सुधीर देवरे यांनी सांगितले.

या जेटीच्या कामाची निविदा २७ ऑक्टोबरला निघाली असून, निविदा भरण्याची शेवटची तारीख २१ नोव्हेंबर २०२२ आहे. पुढील दोन वर्षांत जेटीचे काम पूर्ण होईल. हे बांधकाम मेरीटाईम बोर्डाच्या तज्ज्ञ टीमच्या देखरेखीखाली करण्यात येणार आहे. किल्ल्याच्या पश्चिमेकडे प्रशस्त दगडी बांधकाम केलेले ग्राउंड असल्याने पर्यटकांना तेथे बसून विशाल समुद्राचा मनसोक्त आनंद घेता येईल, अशी माहिती मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी या वेळी दिली.

# सांबरकुंड धरणासंदर्भात आज मंत्रालयात बैठक

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील सांबरकुंड धरणासंदर्भात उद्या मंत्रालयात एका बैठकीचे आयोजन केले जाणार आहे. वन, महसुल आणि जलसंपदा विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. रखडलेल्या या प्रकल्पाचे काम शिघ्रगतीने मार्गी लावण्याच्या दृष्टीने या वेळी प्रयत्न केले जातील, अशी माहिती रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी (दि. ३१) अलिबाग येथे दिली.

सांबरकुंड धरण प्रकल्पाच्या आढाव्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी पालकमंत्री सामंत बोलत होते. जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील, प्रांताधिकारी प्रशांत ढगे आणि जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय जाधव यांच्यासह आमदार महेंद्र दळवी आणि आमदार महेंद्र थोरवे उपस्थित होते.

अलिबाग तालुक्यातील शेतजमीन सिंचनाखाली यावी, म्हणून या प्रकल्पाला २००२ साली मंजुरी देण्यात आली होती. १०३ हेक्टर खाजगी जागा या प्रकल्पासाठी संपादीत केली जाणार आहे. यासाठी २०११ साली निवाडा जाहीर करण्यात आला होता. मात्र निधी उपलब्ध न झाल्याने भुसंपादन प्रक्रीया पुर्ण होऊ शकली नव्हती. २०२० साली या प्रकल्पाच्या सुधारीत अंदाज पत्रकाला मंजुरी देण्यात आली. ५० कोटींचे हे धरण ७४२ कोटींवर जाऊन पोहोचले. २०२२ साल उजाडले तरी प्रकल्प मार्गी लागलेला नाही.

सांबरकुंड धरण प्रकल्पाचा आढावा पालकमंत्र्यांनी सोमवारी घेतला. प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना वाढीव मोबदला हवा आहे, पण निवाडा प्रसिध्द झाल्यामुळे वाढीव मोबदला देता येणे शक्य नसल्याचे यावेळी प्रांताधिकारी प्रशांत ढगे यांनी सांगितले. त्यावेळी प्रकल्पग्रस्तांना सानुग्रह अनुदान कसे देता येईल, यासंदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून निर्णय घेता येईल, असे पालकमंत्री सामंत यांनी या वेळी स्पष्ट केले.

प्रकल्पात वनजमिनी बुडीत क्षेत्रात येणार असल्याने वन विभागाची परवानगी आवश्यक आहे. या प्रस्ताव मंत्रालयस्तरावर पाठविण्यात आला आहे, अशी माहिती जलसपंदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. त्यावर उद्या सर्व प्रस्ताव घेऊन मंत्रालयात या, वनमंत्र्यांची भेट घेऊन बैठक घेऊ, प्रकल्प असेच मार्गी लागत नाहीत, त्यासाठी पाठपुरावा करावा लागतो. एक नोडल ऑफीसर यासाठी नेमा, गरज पडल्यास दिल्लीत जाऊनही पाठपुरावा करू, आधीच दिरंगाईमुळे प्रकल्पाची किंमत ५० कोटींवरून ७४२ कोटींवर पोहोचली आहे. अशीच परिस्थिती राहिली तर प्रकल्प एक हजार कोटींवर जाईल, वेळकाढूपणा करू नका, असे स्पष्ट निर्देश पालकमंत्र्यांनी या वेळी दिले.

## PANVEL MUNCIPAL CORPORATION

**CORRIGENDUM TO TENDER NOTICE**

**CITY ENGINEER'S OFFICE (PMAY DEPARTMENT)**

**INVITATION OF TENDER FOR THE WORKS OF "CONSTRUCTION OF HOUSING COMPLEX UNDER PRADHANMANTRI AAWAS YOJANA" (PMAY)**

Offers by way of e-tendering (Lump Sum Turn-key Form) are invited by the Commissioner, Panvel Municipal Corporation from contractors in e-tendering system for following works. Contractor shall quote his offer considering all taxes excluding GST.

CORRIGENDUM NO.- 01

Tender program is revised as under -

| N ame of work | Last date of submission of tender | Date of Opening of Technical bids |
|---|---|---|
| 1) Survey, Planning, Designing, Building Construction, Obtaining All Relevant Permissions, Required Completion/ Occupancy Certificate from Concerned Local Authority On Lump-Sum Turnkey Basis for Construction of Affordable Housing Under Pradhan Mantri Awas Yojana (Urban) For Rehab and Free Sale Dwelling Units EWS - 649& LIG - 165 with Commercial Component of 89 Shops in Panvel Municipal Corporation (PMC) Area.<br>**Tender .No.PMC/CE/ PMAY/ 90/ 2022** | 17/11/2022 up to 17 Hrs. | 18/11/2022 |
| 2) Survey, planning, designing, building construction, obtaining all relevant permissions, required completion/occupancy certificate from concerned authority on EPC (Lump-sum) for Construction of affordable housing under Pradhan Mantri Awas Yojana (Urban) for Rehab and Free sale dwelling units EWS 1602& commercial component of .87 shops at Patel mohalla & kachhi mohalla within Panvel Municipal Corporation area.<br>**Tender .N o.PMC/CE/ PMAY/ 91 / 2022** | 17/11/2022 up to 17 Hrs. | 18/11/2022 |

The details of above works, such as Earnest Money Deposit, Security Deposit, Terms& Conditions of the Tender and Schedule of works, are available on website www.mahatenders.gov.in Tenders for these works are to be submitted by e-tendering system. Bidders can avail the e-tender document **from 19/09/2022 to 17/11/2022** up to 5.00 PM.

Bidders should submit their offer by way of e-tendering system only. The last dateof Submission by way of e-tendering will be **17/11/2022 up to 5.00 PM.** Commissioner, Panvel Municipal Corporation reserves the right to accept. or reject any or all tender without giving any reason thereof.

**All other conditions will remain unchanged.**

**sd/-**
**(Kalpita Pimpale)**
**Dy. Commissioner**
**Panvel Municipal Corporation,**
**Panvel - 410 206**

# खालापूरच्या उपनगराध्यक्षांचा राजीनामा

**खोपोली : प्रतिनिधी**

राज्यातील सत्तांतराची धग खालापूरपर्यंत पोहचली असून दहा महिन्यापूर्वी नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदावर विराजमान राष्ट्रवादीचे राजेश पारठे यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे.

दहा महिन्यांपूर्वी खालापूर नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक झाली होती. त्या वेळी सत्ता स्थापन करण्यासाठी शिवसेनेला एका नगरसेवकाची, तर शेकापला दोन नगरसेवकांची गरज होती. तेव्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश पारठे यांनी आमदार महेंद्र थोरवे यांना दिलेला शब्द पाळत शिवसेनेला पाठिंबा दिला होता. शिवसेनेला नगराध्यक्षपद, तर उपनगराध्यक्षपद राष्ट्रवादीच्या राजेश पारठे यांना मिळाले होते.

जून महिन्यात राज्यात महाविकास आघाडीचे सरकार कोसळले आणि शिवसेना (शिंदे गट) व भाजपचे सरकार आले. खालापूर नगरपंचायतीत शिवसेनेला सत्तेपर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका असणारे आमदार महेंद्र थोरवे शिंदे गटात गेल्याने खालापूर नगरपंचायत शिंदे गटाच्या ताब्यात आहे. आमदार थोरवे यांचा राष्ट्रवादीसोबत टोकाचा संघर्ष आहे. त्यामुळे उपनगराध्यक्ष राजेश पारठे यांच्यावर अविश्वास ठराव येण्याची शक्यता होती. त्याआधीच पारठे यांनी सोमवारी उपनगराध्यक्षपदाचा राजीनामा नगराध्यक्ष रोशन मोडवे यांच्याकडे सुपूर्द केला.



**खालापूर शहराच्या विकासात राजकारण आणायचे नाही. त्यामुळे उपनगराध्यक्षपदाचा राजीनामा मी दिला आहे.**
**-राजेश पारठे, माजी उपनगराध्यक्ष, खालापूर नगरपंचायत**

# रोह्यात एकता दौड उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

राष्ट्रीय एकता दिवस व सरदार वल्लभभाई पटेल जयंती निमित्ताने सोमवारी (दि. ३१) सकाळी रोहा नगर परिषदे तर्फे कुंडलिका नदी संवर्धन उद्यान ते नगर परिषद कार्यालयापर्यंत एकता दौड आयोजित करण्यात आली होती.

सुरुवातीला कुंडलिका नदी संवर्धन उद्यानात या दौडीमध्ये सहभागी झालेल्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. त्यानंतर सकाळी दहा वाजता दौडीला सुरुवात झाली. रोहा नगर परिषदेचे प्रशासक धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आलेल्या या एकता दौडमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी हातात बॅनर, फलक घेतले होते. दमखाडी गाव, दमखाडी नाका, मिराज हॉटेल, धाविर मार्केट मार्गे एकता दौड नगर परिषद कार्यालयाजवळ आली. तेथे या दौडीचा समारोप करण्यात आला.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग, माणगांव**
**जल जीवन मिशन ई-निविदा सुचना क्र. १८**
**सन २०२२-२३**

रीस पाणी पुरवठा योजना, ता. खालापूर, जि. रायगड या कामाच्या निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित रक्कम रू. २.१२ कोटी आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. ०१/११/२०२२ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाचा सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

दिनांक :१०/१०/२०२२

**सही/-**
**(व्ही. के. सुर्यवंशी)**
**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग माणगांव**

**इमारतीच्या पुनर्विकासासाठी निविदा मागविणेबाबत नोटीस**

१) शामकुंज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,फायनल प्लॉट क्रमांक ११९/४,हरिओम नगर जवळ,पनवेल,ता.पनवेल, जिल्हा रायगड, या संस्थेने इमारतीच्या पुनर्विकासाचा निर्णय घेतला असून संस्थेने नियुक्त केलेल्या वास्तुविशारदानी याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार केला आहे.सदर प्रकल्प अहवालाची संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे दिनांक ०२/११/२०२२ ते दिनांक ०५/११/२०२२ या कालावधीत सकाळी १०-०० ते दुपारी ३-०० या वेळेत या इमारतींच्या पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक याना पाहणी करता येईल,व त्याआधारे पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक यांचेकडून दिनांक ०५/११/२०२२ ते दिनांक ०९/११//२०२२ या कालावधीत सकाळी १०-०० ते दुपारी ३-०० या वेळेत आपल्या निविदा संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे जमा कराव्यात.तसेच निविदा हया कमीत कमी रकमेला प्राधान्य अशा स्वरुपाच्या नसून सभासदाना योग्य वाटेल त्या विकासकाच्या निविदेची निवड सर्वसाधारण सभेत करण्यात येईल. निविदा मंजूर किंवा नामंजूर करणेबाबतचा अधिकार सर्वस्वी संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा असेल,त्याबाबत कोणतेही कारण देण्यास संस्था बांधील नाही.

**सही/- चेअरमन | सही/- सेक्रेटरी | सही/- ट्रेझरर**

**शामकुंज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
**नोंदणी क्र. आरजीडी/पीडब्ल्युएल/एचएसजी/(टिसी)/१६०३/सन २०००, दि. १६/१०/२०००,**
**फायनल प्लॉट क्रमांक ११९/४, हरिओम नगर जवळ,पनवेल,ता.पनवेल, जिल्हा रायगड,**

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे अधिकृत/अनधिकृत विटभट्टी धारकांना खालील तपशीलानुसार विटभट्टी धारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे करारनामा / वाटपपत्र प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| १ | विटभट्टी संचिका क्र.१ | | | | २१०० चौ.मी. | सेक्टर १५ न्यु पनवेल (प.) येथील भूखंड क्र. ६५ क्षेत्र २१०० चौ.मी. | १) रमेश शनिवार पवार<br>**२) भरत रामदास ठाकूर (मयत)** (C.M.A. No. ८१६/२०१९) यांचे वारस<br>२.१) नितीन भरत ठाकुर<br>२.२) निशांत भरत ठाकुर<br>२.३) भाग्यश्री राजेश पावशे<br>२.४) भावना मिनार पाटील<br>२.५) मनिषा महेश पाटील<br>२.६) यमुना ऊर्फ यमुनाबाई भरत ठाकुर<br>३) गोटीराम जानू तोडेकर<br>४) गोपीनाथ कांगा तोडेकर<br>५) गणपत बाळाराम ठाकूर<br>६) बबन नारायण तोडेकर<br>**७) हरीश्चंद्र कुश्या भगत (मयत)** (C.M.A. No. १८४४/२०२१) यांचे वारस<br>७.१) सुमन ऊर्फ सुमनबाई हरीश्चंद्र ऊर्फ हरीचंद्र भगत<br>७.२) राकेश हरीश्चंद्र भगत<br>७.३) भारती शशीकांत मुंगाजी<br>७.४) अरुना राजेश भगत<br>७.५) आयुश राजेश भगत<br>७.६) श्रावण राजेश भगत<br>८) चंद्रकांत भोक्या ठाकूर<br>९) मदन चंदर पवार<br>१०) चंद्रकांत दगडु ठाकुर<br>११) दिलीप गजानन ठाकुर<br>१२) मधुकर बेलदार मयेकर<br>**१३) शिवराम दिनकर धर्णेकर (मयत) यांचे वारस** (C.M.A. No. ११६३/२०२१)<br>१३.१) संतोष शिवराम धर्णेकर<br>१३.२) समाधान शिवराम धर्णेकर<br>१३.३) सारिका सुधाकर घरत<br>१३.४) रेणुका शिवराम धर्णेकर<br>१४) नामदेव हरीश्चंद्र पाटील<br>१५) महेंद्र गोटीराम तोडेकर<br>१६) अरूण हरिश्चंद्र तोडेकर<br>१७) अशोक विनायक गायकर<br>१८) प्रकाश पदु तोडेकर<br>**१९) काशिनाथ आत्माराम पाटील (मयत) यांचे वारस** (C.M.A. No. १५९०/२०२१)<br>१९.१) विश्वास काशिनाथ पाटील<br>१९.२) विलास काशिनाथ पाटील<br>१९.३) अविनाश काशिनाथ पाटील<br>२०) बबन भोक्या ठाकुर<br>२१) हनुमंत जोमा ठाकुर | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, सबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र/करारनामा करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/३१४/२०२२-२३

# ‘युनिटी रन’मधून एकतेचा संदेश

## पनवेलच्या वडाळे तलाव येथे उपक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

राष्ट्राची सुरक्षा, एकता आणि अखंडता बळकट करण्याच्या दृष्टीने सोमवारी (दि. ३१) सकाळी ७ ते ८ या वेळेत सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाच्या स्मरणार्थ ’युनिटी रनचे’ आयोजन वडाळे तलाव येथे करण्यात आले होते. आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमामध्ये नागरिकांनी व्यापक सहभाग नोंदविला.

या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, महापालका उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त गणेश शेटे, महापालिका पशुवैद्यकिय अधिकारी अधिकारी डॉ. बी. एन. गीते, सामान्य प्रशासन प्रमुख दशरथ भंडारी, कळंबोली प्रभाग प्रमुख सदाशिव कवठे, पनवेल प्रभाग प्रमुख अमर पाटील, उपअभियंता सुधीर साळुंखे, महापालिकेच्या विविध विभागाचे विभाग प्रमुख, माजी नगरसेवक, नगरसेविका, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्याच्या उद्देशाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाच्या स्मरणार्थ आजच्या ‘युनिटी रन’मध्ये सुमारे १०० हून अधिक नागरिकांनी सहभाग घेऊन वडाळे तलावाभोवती एक फेरी मारली. महापालिकेच्या वतीने अथर्व मिडीयाच्या माध्यमातून हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रीय एकात्मतेची प्रतिज्ञा घेऊन करण्यात आली. यामध्ये सर्व वयोगटातील नागरिकांनी तसेच महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. दरम्यान, पनवेल महापालिका मुख्यालयात राष्ट्रीय एकता दिनाची शपथ घेण्यात आली.





# कोकण भवनमध्ये दक्षता जनजागृती सप्ताहाचा प्रारंभ

## अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भ्रष्टाचाराविरुध्द जनजागृती होण्याच्या उद्देशाने सोमवारी (दि. ३१) कोकण भवनमध्ये दक्षता जनजागृती सप्ताहाचा प्रारंभ करण्यात आला. विभागीय महसूल कार्यालयाच्या बैठक सभागृहात उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांनी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. या वेळी उपायुक्त (विकास) गिरीश भालेराव, मुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो) राजलक्ष्मी येरपुडे आदी उपस्थित होते.

दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात येते. त्या सप्ताहात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जातो. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा आणि सत्यनिष्ठा याबद्दलच्या दृढनिश्चयाचे बळकटीकरण करण्यासाठी नागरिकांच्या सहभागाने हा सप्ताह साजरा करण्यात येतो. यंदाच्या २०२२ या वर्षी केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत या ‘दक्षता जनजागृती सप्ताहाचे’ आयोजन करण्यात आले आहे. ‘भ्रष्टाचारमूक्त भारत-विकसित भारत’ (कॉर्पोरेशन फ्री इंडिया फॉर अ डेव्हलोप नेशन) ही या कार्यक्रमाची संकल्पना आहे.

उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. या वेळी गिरीश भालेराव यांनी या वेळी महाराष्ट्राचे राज्यपाल भगत सिंह कोश्यारी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त जनतेला दिलेल्या संदेशाचे वाचन केले. या वेळी कोकण भवनमधील विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# दोन मुलांची हत्या करून आईचा आत्महत्येचा प्रयत्न

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत एक धक्कादायक घटना घडली आहे. येथील एका महिलेनं आपल्या पोटच्या दोन मुलांची हत्या करून स्वत: आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. संबंधित महिलेवर रुग्णालयात उपचार सुरू असून दोन्ही मृत मुले अल्पवयीन आहेत. या दुर्दैवी घटनेचे नेमके कारण समोर आले नाही. या प्रकरणी पोलिसांनी मृत मुलांच्या वडिलांना ताब्यात घेतले आहे. घटनेचा पुढील तपास केला जात आहे.

**नवी मुंबईतील धक्कादायक घटना**


पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, नवी मुंबईतील घणसोली गावात चिंच आळी येथे साडे नऊ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला आहे. एका महिलेने स्वतःच्या दोन अल्पवयीन मुलांची गळा चिरून हत्या केली आहे. मुलांची हत्या केल्यानंतर संबंधित मातेनं स्वतःही हाताची नस कापून आत्महत्येचा प्रयत्न केला, पण ही बाब शेजाऱ्यांच्या निदर्शनास आल्यामुळे महिलेचा जीव वाचला आहे. शेजाऱ्यांनी रबाळे पोलिसांना घटनेची माहिती देताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पुष्पा गुर्जर असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे नाव आहे. तर टीपू (वय चार) आणि राहुल (वय एक) असे खून झालेल्या मुलांची नावे आहेत.

गेल्या काही वर्षांपासून हे दाम्पत्य चिंच आळीत राहत होते. ते मूळचे राजस्थानातील असून महिलेचा पती आइस्क्रीम विकण्याचे काम करतो. ही घटना आर्थिक अडचणीत घडली नसल्याची प्राथमिक माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. सध्या महिलेवर उपचार सुरू असून रात्री साडे अकरा वाजता पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# वाहनाच्या धडकेत कोल्हा जखमी


**उरण : रामप्रहर वृत्त**

उरणमधील खोपटा परिसराला जोडणाऱ्या मार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत कोल्हा जखमी झाला आहे. सोमवारी (दि. ३१)उरण खोपटा मार्गावर एक कोल्हा जखमी अवस्थेत आढळला आहे. या जखमी कोल्ह्यावर उपचार करता यावेत याकरीता उरणमधील निसर्ग व सर्पमित्र प्रयत्न करीत आहेत.



काही दिवसांपूर्वी अशाच प्रकारे उरण तालुक्यातील डोंगरी पाणजे येथील पाणथळ भागात दोन कोल्हे निदर्शनास आले होते. उरण तालुक्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकास व नवी मुंबईचा परिसर म्हणून नागरीकरण वाढू लागला आहे. त्यामुळे उरणमधील वन्यजीव वास्तव्यासाठी वणवण फिरत आहेत. उरणच्या औद्योगिक परिसरात ही कोल्ह्याचे अस्तित्व असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानंतर हा कोल्हा उरणच्या पूर्व भागात जखमी अवस्थेत आढळून आला असल्याची माहिती निसर्ग व वन्यजीव संरक्षण संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी यांनी दिली आहे.

# मोकाट श्वानाने चक्क लुटारूला पकडले



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीतील फळ मार्केटमध्ये राजा नावाच्या श्वानाने कमाल केली आहे. या कुत्र्याने चोरी करून धावणाऱ्या चोरट्याला पकडून दिले आहे. त्याच्या या कामगिरीचे कौतुक होत आहे.

संबंधित चोरट्याने मध्यरात्री भाजी मार्केटमधील शौचालयातून फळ मार्केटमध्ये प्रवेश केला होता. संबंधित चोरट्यासोबत अन्य दोन साथीदार होते. तिघांनी फळ मार्केटमध्ये प्रवेश करून एका व्यापाऱ्याचे ३० हजार रोख रक्कम आणि मोबाइल फोन लंपास केला.

संबंधित तिन्ही चोरटे ऐवज घेऊन पळ काढताना फळ मार्केटमधील राजा नावाच्या श्वानाने एका चोरट्याला पकडून सुरक्षारक्षकाच्या हवाली केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा श्वान रस्त्यावरील असून तो सध्या एपीएमसी फळ बाजारात सुरक्षा रक्षकांचीच भूमिका बजावत आहे. मोकाट श्वानाच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# नवी मुंबईत उत्तर भारतीयांची छट्पूजा; महिलावर्गात उत्साह



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहरात छट्पूजा उत्सव मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा केला जात आहे. नवी मुंबई शहरात पाम बीच ज्वेल ऑफ नवी मुंबई या परिसरात तसेच शहरातील विविध तलावांच्या ठिकाणी छट्पूजेचा उत्साह सुरू आहे. तीन दिवस चालणाऱ्या उत्सवाचा आजचा दुसरा दिवस. शहरात मोठ्या प्रमाणात उत्तर भारतीयांनी छट्पूजेचे आयोजन केले आहे.



आपल्या पतीला दीर्घायुष्य लाभो व संसार सुखाचा होवो यासाठी ही छट्पूजा केली जात असल्याची माहिती दिनेश शंतीप्रसाद यादव यांनी दिली. नवी मुंबई शहरात विविध जाती धर्माचे तसेच विविध प्रांतातून आलेले नागरिक राहतात. यामध्ये बिहार, उत्तर प्रदेश या विभागातील नागरिकांची संख्याही खूप मोठी आहे. या उत्सवासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते आज शहरात विविध तलावांच्या ठिकाणी तसेच पामबीच खाडी किनारी हा उत्सव साजरा करण्यात आला.

# सोमटणेतील किल्ले आणि रांगोळी स्पर्धांचे बक्षीस वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवप्रेमी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, सोमटणेच्या वतीने आयोजित किल्ले व रांगोळी स्पर्धांचे बक्षिस वितरण करण्यात आले. दरम्यान, शिवप्रेमी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान – सोमटणे व श्री साई ब्लड बँक पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिरही झाले. या उपक्रमासाठी सोमाटणे गावातील ग्रामस्थांनी व मंडळाच्या सदस्यांनी उत्तम प्रकारे नियोजन केले होते.


रांगोळी स्पर्धेसाठी परिक्षक म्हणुन प्रसिद्ध चित्रकार व रांगोळी कलाकार रोशन पाटील, रवींद्र चौधरी, सुरेश पाटील हे उपस्थित होते. किल्ले स्पर्धेसाठी शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेलचे धारकरी विक्रम पाटील, माजी सैनिक उद्य भोसले, अविनाश पाटील, दीपक भोसले हे उपस्थित होते. दोन्ही स्पर्धांच्या वेळी तसेच पद्माकर पाटील, सुशांत पाटील, जितेंद्र दिघे, चेतन पोपेटा, मंदार पाटील, प्रसाद मुंडे, भूषण तोंडे, राकेश दिघे, रूपाली भोपी, प्रतिभा प्रकाश मुंडे ग्रामस्थ उपस्थित होते.

किल्ले स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक श्री वकांडा वॉरियर्स ग्रुप सोमटणे (राजगड किल्ला), द्वितीय क्रमांक पाटील परिवार सोमटणे (खंदेरी किल्ला), तृतीय क्रमांक मुंढे युवा प्रतिष्ठान सोमटणे (पद्मदुर्ग किल्ला), चतुर्थ क्रमांक तन्मय दिनेश कुरंगळी व तन्वेष दिनेश कुरंगळी (प्रतापगड किल्ला), पंचम क्रमांक जय सुनील बैकर (राजगड किल्ला). यासोबतच रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अष्टविनायक महिला बचत गट, द्वितीय क्रमांक साईकृपा महिला बचत गट, तृत्रीय क्रमांक प्रतिक्षा संतोष पाटील आले आहेत.



## खारघरमध्ये मंगळसूत्र पळविले

**पनवेल :** रिक्षेत बसलेल्या ३८ वर्षीय महिलेच्या गळ्यातील पाच तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून चोरटे दूचाकीवरून पसार झाले आहेत. खारघर पोलीस ठाण्यात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर सेक्टर १७, सेलिब्रेशन सोसायटी येथील राधा महेश कुमार ह्या डी मार्ट, सेक्टर १५ येथून घरी जाण्यासाठी रिक्षा करत होत्या. या वेळी रिक्षात बसताना बाजूच्या दुचाकीवरील दोन व्यक्तीपैकी एकाने राधा कुमार यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून नेले.



**पनवेल : माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्ताने महापालिकेच्या मुख्यालयात सोमवारी अभिवादन करण्यात आले. या वेळी उपायुक्त सचिन पवार, कैलास गावडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, सामान्य प्रशासन प्रमुख दशरथ भंडारी, आस्थापना विभाग प्रमुख नामदेव पिचड आदी उपस्थित होते.**

# आम्ही पिरकोनकर समूहाच्या गडकिल्ले स्पर्धेचे बक्षीस वितरण



**उरण : बातमीदार**

आम्ही पिरकोनकर समूह आयोजित पाचव्या दिवाळी गडकिल्ले स्पर्धेचे बक्षिस वितरण रविवारी (दि. ३०) झाले. उरण तालुक्यातील पिरकोन येथील पंचरत्न इंग्लिश मेडीयम स्कूलच्या सभागृहात रंगलेल्या या दिमाखदार कार्यक्रमात सर्व स्पर्धक किल्लेदारांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व आकर्षक सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. पारितोषकांसाठी अशोक मंगल गावंड यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र ठाकूर यांनी केले. माजी जि.प.सदस्य जीवन गावंड, जेएनपीटी विद्यालयाचे प्राचार्य गिरीश पाटील, सायली पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी व्यासपीठावर जगदिश गावंड, अजय शिवकर, मनिश पाटील, नागेंद्र म्हात्रे, शेखर म्हात्रे, चंद्रशेखर भोमकर आदी उपस्थित होते.

गडकिल्ल्यांच्या या उरण तालुकास्तरीय स्पर्धेत जवळपास पाऊणशे प्रतिकृती नोंदवल्या गेल्या. कांबळीवाडी ग्रुप (बोरी) येथील शिवनेरी किल्ल्यास प्रथम क्रमांकाने गौरवण्यात आले. निसर्ग म्हात्रे (वशेणी) यास द्वितीय तर युईएस कॉलेज, उरण व गोंधळीपाडा ग्रुप, पिरकोन यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. दहा किल्ल्यांना उत्तेजनार्थ पारितोषक तर उर्वरीत स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. चेतन गावंड (अध्यक्ष), तुषार म्हात्रे(सचिव), सुरेंद्र गावंड, प्रमोद पाटील यांनी स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून काम पाहीले.

सूत्रसंचालन तुषार म्हात्रे व प्रमोद पाटील यांनी समारोप केला. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मनोहर म्हात्रे, भूषण गावंड, हेमंत गावंड यांनी मेहनत घेतली.

# उरणमध्ये विद्यार्थ्यांनी घेतली एकतेची शपथ

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ३१ ऑक्टोबर हा सरदार वल्लभाई पटेल यांची जयंती दिन राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा करण्यात आला. राष्ट्रीय एकता दिनानिमित्त देशातील ७५० जिल्ह्यांमध्ये शिक्षण व क्रिडा मंत्रालयामार्फत ७५००० एकता दौडचे आयोजन केले होते.

या उपक्रमाचा भाग म्हणून महाविद्यालयाच्या वतीने एकता दौडचे आयोजन केले. प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उरण पीरवाडी समुद्र किनारा ते दर्गादरम्यान दौड करून उपक्रमात सहभाग नोंदवला. या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी एकतेची शपथ घेतली व सरदार वल्लभाई पटेल यांना अभिवादन केले. कार्यक्रमात इतिहास विभागप्रमुख डॉ. एम. जी. लोणे, एनएसएस प्रमुख डॉ. दत्ता हिंगमिरे व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



# आंबेत पुलाचे काम आठ दिवसांत सुरू करा

## पालकमंत्री उदय सामंत यांचे निर्देश

**अलिबाग : प्रतिनिधी**

सावित्री नदीवरील रायगड व रत्नागिरी जिल्ह्यांना जोडणाऱ्या आंबेत पुलाच्या कामाचे श्रेय लाटण्यासाठी कुणी राजकीय दबाव आणून या कामाची निविदा प्रक्रिया लांबवत असेल तर ते चालणार नाही. आजच (दि. ३१) निविदाप्रक्रिया पूर्ण करून आठ दिवसात पुलाचे काम सुरू करा, असे आदेश रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी संबंधीत अधिकाऱ्यांना दिले.

जनता दरबार घेण्यासाठी पालकमंत्री उदय सामंत सोमवारी अलिबागला आले होते. त्यापूर्वी त्यांनी राजस्व सभागृहात आंबेत पूल आणि अलिबाग तालुक्यातील संबरकुंड धरणाच्या कामांचा आढावा घेतला. या वेळी आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील उपस्थित होते.

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याला जोडणारा आंबेत पूल गेल्या तीन चार वर्षापासून नादुरुस्त झाला असून त्याच्या दुरुस्तीसाठी साडे सोळा कोटी खर्च करण्यात आला आहे. मात्र तरीही हा पूल वाहतुकीस बंद ठेवण्यात आलेला आहे. परिणामी रायगडमधून रत्नागिरीकडे जाणाऱ्या व येणाऱ्या प्रवाशांना वळसा घेऊन प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी पसरली आहे.



सोमवारी झालेल्या बैठकीत पालकमंत्री उदय सामंत यांनी याबाबत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. काम सुरू का होत नाही, असा प्रश्न पालकमंत्री सामंत यांनी विचारला. त्यावेळी दोनवेळा निविदा मागविल्या परंतु ठेकेदारांकडून प्रतिसाद मिळत नाही. तिसऱ्यांदा निविदा मागविल्या. त्यावेळी दोन निविदा आल्या. आज (दि. ३१) निविदा उघडली जाणार असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यावेळी निविदा आज उघडा. आठ दिवसात काम सुरू करा, असे आदेश पालकमंत्री उदय सामंत यांनी दिले.

आंबेत पुलाच्या कामाची निविदा पुढे पुढे ढकलली जात आहे. याबाबत मला चौकशी लावावी लागेल. श्रेय वादावरून निविदाप्रक्रिया पुढे जात असेल तर ते चुकीचे आहे. टेंडरप्रक्रिया रखडल्याने जनतेच्या रोषाला आम्हाला सामोरे जावे लागत आहे. जनतेची गैरसोय होत आहे. आंबेत पूल बंद असल्याने या मार्गावरील वाहतूक बंद ठेवली आहे. पर्याय म्हणून नदीतून रो रो सेवा सुरू आहे. अवजड वाहने रो रोमधून जात आहेत. मात्र एसटी बस नेली जात नाही. यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या रायगड विभाग अधिकाऱ्यांशी चर्चा करा. जिल्हाधिकारी यांच्या अधिकारात निर्णय घेऊन रो-रोमधून एसटी बस सोडण्याबाबत प्रयत्न करा, असे आदेशही पालकमंत्री उदय सामंत यांनी या वेळी दिले.

# आक्षी शिलालेख परिसर सुशोभीकरण कामाचे उद्घाटन







**अलिबाग : प्रतिनिधी**

मराठी भाषेतील आद्य शिलालेख असलेल्या आक्षी येथील शिलालेखाचे जतन रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करण्यात आले असून, या शिलालेख परिसर सुशोभीकरण कामाचे उद्घाटन सोमवारी (दि. ३१) राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. या कामासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजना तसेच जिल्हा नियोजन समितीने निधी उपलब्ध करून दिला होता.

मराठी भाषेतील आद्य शिलालेख व आणखी एक शिलालेख असे दोन शिलालेख आक्षी गावात रस्त्याच्या कडेला दुर्लक्षित अवस्थेत उभे होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी शिलालेखाची पाहणी करीत त्यांचे जतन करण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. राज्य सरकारने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतंर्गत शिलालेख जतन करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला होता.

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतंर्गत प्राप्त निधीतून आक्षी शिलालेखाचे येथील समुद्रकिनारी असलेल्या साई मंदिर परिसरात सुयोग्य जागेत प्रस्तापित करणे व परिसर सुशोभीकरण करण्यात आले आहे. या कामाचे उद्घाटन सोमवारी रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी शिलालेखाचे जतन करण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल सर्व उपस्थितांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांचे कौतुक केले.

आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता के. बाय. बारदेसकर, आक्षीचे सरपंच नंदकुमार वाळंज, माजी जिल्हा परिषद सदस्य कबन नाईक उपस्थित या वेळी होते.

# द्रुतगती मार्गावर भीषण अपघात; महिलेचा मृत्यू, दोन जण गंभीर

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर रसायनी हद्दीत सोमवारी (दि. ३१) सकाळी पुणे लेनवर उभ्या असलेल्या मालवाहू ट्रकला मागून येणाऱ्या कारने जोरदार धडक दिली. या अपघातात कारमधील सिंग कुटूंबातील महिलेचा गंभीर दुखापतीमुळे जागीच मृत्यू झाला तर तिचा पती व दोन लहान मुले गंभीर जखमी झाले. त्यांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

द्रुतगती मार्गावरील रसायनी हद्दीत पुणे लेनवर एक मालवाहू ट्रक (एमएच-१२,टीव्ही-७३३४) उभा होता. सोमवारी सकाळी या ट्रकला कार (एमएच-१२,डीइ-७६०) ने मागून जोरदार धडक दिली. या अपघातात कारमधील इंद्रनील सिंग (वय ३५) ही महिला गंभीर दुखापतीमुळे जागीच ठार झाली तर या महिलेचा पती कार चालक जगजीत सिंग (वय ३९), मुलगा दलवीर सिंग (वय १०) आणि मुलगी बिस्मित सिंग (वय ५) हे तिघे जखमी झाले. त्यांना कामोठे



येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची नोंद रसायनी पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

# माणगाव-पुणे रस्त्यावर कारची दुचाकींना धडक, तिघे जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव-पुणे रस्त्यावरील सणसवाडी गावच्या हद्दीत रविवारी (दि. ३०) संध्याकाळी एका कारने दोन दुचाकींना धडक दिली. या अपघातात तीन जण जखमी झाले.

गोविंद विष्णुदास मुंदडा (वय ३०, सध्या रा. धनकवडी, पुणे, मूळ रा. पुसेगाव, जि. हिंगोली) आणि त्याचा मित्र श्रावण प्रकाश सांगळे (वय ३०, रा. माणिकबाग, पुणे) हे दोघे रायगड किल्ला फिरून रविवारी संध्याकाळी अनुक्रमे शाईन मोटारसायकल (एमएच-१२,टीझेड-७३५६) आणि स्कुटी (एमएच-१२,युआर-८२५६) वरून परत निजामपूर ताम्हिणी घाटमार्गे पुण्याकडे जात होते.

माणगाव तालुक्यातील सणसवाडी गावच्या हद्दीत टी-पॉईंटच्या पुढे एका वळणावर भरधाव वेगातील एका कार (एमएच-१४,जी-वाय-८७०८) ने विरुद्ध दिशेला येऊन दोन्ही दुचाकींना धडक दिली. या अपघातात गोविंद मुंदडा, उद्धव पांडुरंग शिंदे (वय २९, रा. पिंपळे सौंदागर, पुणे) आणि श्रावण सांगळे जखमी झाले.

या प्रकरणी गोविंद मुंदडा यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कार चालक आकाश दत्तात्रय कुलकर्णी (वय २७, रा. पिंपळे सौंदागर, पुणे) याच्यावर भादवि कलम २७९,३३७,३३८,मोटार वाहन अधिनियम १९८८चे कलम १८४,१३४ प्रमाणे माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास हवालदार श्री. तुणतुणे करीत आहेत.

# माणगाव पोलिसांनी मोबाइल दिला मालकाच्या ताब्यात

**माणगाव : प्रतिनिधी**

गोवा ते मुंबई रेल्वे प्रवासादरम्यान भादाव ते माणगाव गावच्या हद्दीत रविवारी (दि. ३०) एका प्रवाशाचा ओप्पो कंपनीचा ४० हजार रुपये किमतीचा मोबाइल हातातून रुळावर पडला होता. हा महागडा मोबाइल सापडल्यानंतर माणगाव पोलिसांनी मोबाइल मालकाचा शोध घेऊन तो सोमवारी (दि. ३१) सकाळी त्याच्या ताब्यात दिला.

इरफान काशीम शेख (रा. टागोर नगर, विक्रोळी, मुंबई) असे मोबाइलच्या मालकाचे नाव असून, ते रविवारी गोवा ते



मुंबई असा रेल्वेने प्रवास करीत होते. प्रवासादरम्यान माणगाव जवळील भादाव गावाच्या हद्दीत त्यांचा मोबाइल हातातून रेल्वे मार्गावर पडला. माणगावचे सहाय्यक फौजदार कदम व पोलीस शिपाई मिसाळ यांनी माणगाव ते भादाव असा दोन किमी चालत जाऊन शोध घेतला असता हा मोबाइल भादाव गावच्या हद्दीत रेल्वे मार्गावर मिळून आला. पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी सदरचा मोबाइल मालक इरफान शेख यांच्या ताब्यात दिला.

# जनावरांचे तत्काळ लसीकरण करून घ्यावे

## कर्जत तालुका पशुधन विभागाचे आवाहन

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात लम्पी स्कीन या आजाराने तब्बल सहा गोवंशीय जनावरांचे बळी गेले आहेत. तालुक्यात आजही १७ गावात लम्पीसदृश आजाराने बाधित जनावरे आहेत. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाने कर्जत तालुक्यात सर्व गोवंशीय जनावरांचे लसीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी पशुपालक शेतकऱ्यांनी आपल्या गोवंशीय आणि म्हैस वर्गीय जनावरांचे तत्काळ लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन तालुका पशुधन विभागाच्या वतीने गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांनी केले आहे.

लम्पी स्कीन हा आजार माशा, कीटक, चिलटे, गोचीड-गोमाशा यांच्या मार्फत तसेच बाधित जनावरांच्या थेट संपर्काने इतर निरोगी जनावरांमध्ये पसरत असल्याने, सर्व गोठे व परिसर स्वच्छ ठेवून गोठ्यात तसेच जनावरांच्या अंगावर, आवश्यक फवारणी आणि इतर उपाययोजना करणे अपेक्षित आहे. कर्जत तालुक्यातील काही गावामध्ये लम्पी स्कीन बाधित जनावरे आढळलेली आहेत, त्यांनी दर दोन दिवसांनी आवश्यक फवारणी करणे गरजचे आहे, याबाबत पशुसंवर्धन विभागाने परिपत्रक काढले आहे.

स्थानिक पशुवैद्यकीय दवाखान्याच्या मार्फत आपल्या गावांमध्ये गायवर्गीय जनावरांना लम्पी स्कीन प्रतिबंधक



लसीकरण करण्यात आले आहे की नाही, याची खात्री पशुपालकांनी करावी तसेच कोणाची गायवर्गीय जनावरांचे लसीकरण करणे बाकी असल्यास तत्काळ नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यास संपर्क करून गोवंशीय जनावरांचे लसीकरण करून घेण्याचे आवाहन गटविकास अधिकारी साबळे यांनी केले आहे.

# रोहा, खोपोली, खालापुरात छट्पूजा उत्साहात साजरी



**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील उत्तर भारतीय समाजाच्या वतीने रविवारी (दि. ३०) सायंकाळी कुंडलिका नदीच्या किनारी छट्पूजा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या वेळी महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सूर्याची मनोभावी पूजा केली.

उत्तर भारतीय संघाच्या वतीने रविवारी सायंकाळी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले तर सोमवारी सकाळी उपासक महिलांचा उत्तर भारतीय महासंघाचे अध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह यांच्या वतीने साडी देवून सत्कार करण्यात आला.

उत्तर भारतीय महासंघाचे अध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, विश्वकर्मा सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार विश्वकर्मा, पूजा कमेटीचे अध्यक्ष बाबुलाल वर्मा, सचिव मुनेश्वर वर्मा, खजिनदार संतोष विश्वकर्मा, रामप्रकाश कुशवाह, सुरेंद्र मिश्रा, अमित पांडे, सत्यदेव कुशवाह, हेमंत यादव, बसंत विश्वकर्मा, ब्रिजलाल विश्वकर्मा, राजेंद्र जयस्वाल, धनंजय सिंग, हरिश्चंद्र विश्वकर्मा, धीरज विश्वकर्मा, हरीश विश्वकर्मा, भिम विश्वकर्मा, नागेंद्र विश्वकर्मा, दिलीप विश्वकर्मा, सुभाष साहनी यांच्यासह उत्तर भारतीय महिला आणि स्थानिक ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

**खोपोली : प्रतिनिधी**

आपल्या नोकरी व व्यवसायानिमित्त खोपोली शहरात राहणाऱ्या उत्तर भारतीयांनी शहराच्या वेगवेगळ्या भागातील नदीकाठी पवित्र हा छट्पूजा सण उत्साहात साजरा केला. या निमित्ताने शहरातील वेगवेगळ्या गणेश विसर्जन घाटावर या छट्पूजेला राजकीय पक्षांच्या नेत्यांनी उपस्थितीत दर्शवून पूजेत सहभाग नोंदविला.

जीवन सुखदायी, संपन्न व समृद्ध व्हावे, यासाठी ही छट्पूजा करण्यात येते, अशी उत्तर भारतीयांची आख्यायिका आहे. या सणाला उत्तर भारतीय नागरिक सहकुटुंब नदीकाठी उपस्थित राहून मनोभावे पूजा करतात. शहरातून वेगवेगळ्या भागातून नागरिक वाजत गाजत नदीकाठी येत असतात. खोपोली शहरातून वाहणाऱ्या पाताळगंगा नदीच्या गगनगिरी आश्रम, वासरंग गणेश विसर्जन घाट, शिळफाटा, तसेच खालापूर तालुक्यातील वेगवेगळ्या नदीघाटावर छट्पूजेचा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, माजी नगरसेवक किशोर पानसरे, संदीप पाटील, मनेश यादव यांच्यासह अनेक मान्यवरांनी या सोहळ्यात सहभाग नोंदविला.



# पेणमध्ये एकता दौड





**पेण : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी संपूर्ण देशाला एकात्मतेच्या धाग्यात बांधण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळेच सरदार पटेल यांची जयंती (३१ ऑक्टोबर) देशात राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी केली जात आहे. राष्ट्रीय एकता दिनानिमित्त सोमवारी पेणमध्ये नगरपालिका प्रशासन, तहसील कार्यालय, वन विभाग, प्रहार अकॅडमी, कमांडो अकॅडमी व अन्य सामाजिक संस्थांच्या माध्यमातून एकता दौड आयोजित करण्यात आली होती.

नायब तहसीलदार रमाकांत कालेकर, पेण नगरपालिकेचे प्रशासक जीवन पाटील, प्रशासकीय अधिकारी राजाराम नरुटे, लिपिक वृषाली निंबरे, सरकारी रुग्णालय कर्मचारी प्रभाकर सोनावणे, भरत निंबरे, किरण शहा, शिवाजी चव्हाण, शेखर अभंग, उमंग कदम, रमेश देशमुख यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक संघटनांचे पदाधिकारी या एकता दौडमध्ये सहभागी झाले होते.यावेळी उपस्थितांनी राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली.

# ऑस्ट्रेलियाचा आयर्लंडवर मोठा विजय



**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत सोमवारी (दि. ३१) यजमान ऑस्ट्रेलिया आणि आयर्लंड यांच्यात सामना झाला. यात यजमानांनी दुबळ्या आयर्लंडचा दारूण पराभव करून स्पर्धेतील दुसरा विजय मिळवला. ४२ धावांनी मिळवलेल्या मोठ्या विजयामुळे ऑस्ट्रेलियाच्या नेट रनरेट वाढला आहे. 'कांगारू'च्या घातक गोलंदाजीसमोर आयर्लंडच्या फलंदाजांचा टिकाव लागला नाही. अखेर आयर्लंडचा संघ २० षटकेदेखील खेळू शकला नाही आणि १८.१ षटकांत १३७ धावांवर सर्वबाद झाला.

तत्पूर्वी आयर्लंडने नाणेफेक जिंकून यजमान संघाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. 'कांगारू'चा सलामीवीर डेव्हिड वॉर्नर तिसऱ्या षटकांत अवघ्या तीन धावा करून स्वस्तात माघारी परतला. मग संघाची धुरा कर्णधार ॲरोन फिंचने सांभाळली. त्याला मिचेल मार्शने साथ दिली, पण मार्श नवव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर २८ धावांवर बाद झाला. त्यानंतर ग्लेन मॅक्सवेलने आपल्या कर्णधाराची साथ देण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यालाही अपयश आले आणि तो १३ धावा करून तंबूत परतला. फिंचने ४४ चेंडूत शानदार ६३ धावांची अर्धशतकी खेळी केली. तो १७व्या षटकाच्या अखेरच्या चेंडूवर बाद झाला. अखेरच्या काही षटकांमध्ये मार्कस स्टॉयनिसने ३५ धावांची साजेशी खेळी केली. त्यामुळे यजमान संघाने २० षटकांत ५ बाद १७९ धावा केल्या. आयर्लंडकडून बॅरी मॅककार्थीने सर्वाधिक तीन बळी टिपले, तर जोशुआ लिटलला दोन गडी बाद करण्यात यश आले.

ऑस्ट्रेलियाने दिलेल्या १८० धावांच्या विशाल आव्हानाचा पाठलाग करताना आयर्लंडच्या फलंदाजांना घाम फुटला. आयर्लंडकडून एकट्या लॉर्कन टकरने किल्ला लढवला, मात्र त्यालाही अपयश आले. टकरने ४८ चेंडूंत ७१ धावांची ताबडतोब खेळी केली, मात्र त्याला इतर कोणत्याच फलंदाजाची साथ मिळाली नाही. टकरव्यतिरिक्त आयर्लंडच्या कोणत्याच फलंदाजाला २०चा आकडा गाठता आला नाही. अखेर आयर्लंडचा संघ २० षटकेही खेळू शकला नाही आणि १८.१ षटकांत सर्वबाद झाला. ऑस्ट्रेलियाकडून पॅट कमिन्स, ग्लेन मॅक्सवेल, मिचेल स्टार्क आणि डम झाम्पा यांनी प्रत्येकी दोन बळी टिपले, तर मार्कस स्टॉयनिसने एक गडी बाद केला. 'कांगारू'च्या गोलंदाजांनी केलेल्या सांघिक कामगिरीमुळे ऑस्ट्रेलियाने उपांत्य फेरीकडे कूच केली आहे.

या विजयासह यजमान ऑस्ट्रेलियाच्या संघाने ग्रुप एच्या क्रमवारीत दुसरे स्थान गाठले आहेत. 'या संघाचे सध्या पाच गुण आहेत, मात्र न्यूझीलंडचा नेट रनरेट जास्त असल्याने ते टॉपवर आहे. न्यूझीलंड उपांत्य फेरी गाठणार हे जवळपास निश्चित आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात उपांत्य फेरीसाठी चुरस आहे. इंग्लिश संघ तीन गुणांसह ऑस्ट्रेलियाच्या पाठोपाठ तिसऱ्या स्थानावर आहे.

# राहुलचे अपयश, क्षेत्ररक्षणातील चुका भारताला आफ्रिकेविरुद्ध पडल्या महागात



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाला ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील 'अव्वल १२' फेरीच्या सामन्यात रविवारी दक्षिण आफ्रिकेकडून पराभव पत्करावा लागला. फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातील चुकांचा भारताला प्रामुख्याने फटका बसला.

मुंबईकर सूर्यकुमार यादवने आपली लय कायम राखताना झुंजार अर्धशतकी खेळी केली, मात्र त्याला इतरांची साथ लाभली नाही. क्षेत्ररक्षणात कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली या सर्वांत अनुभवी खेळाडूंनी क्षेत्ररक्षण करताना केलेल्या चुकाही भारताला महागात पडल्या. यासह भारताच्या पराभवामागे अन्यही काही कारणे होती.

भारताचा सलामीवीर केएल राहुलने ट्वेन्टी-२० विश्वचषकापूर्वी झालेल्या ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकांमध्ये धावांची गती वाढवली तसेच दोन मालिकांमधील पाच सामन्यांत मिळून त्याने तीन अर्धशतकेही झळकावली, मात्र ट्वेन्टी-२० विश्वचषकात त्याला हे सातत्य टिकवता आलेले नाही. पाकिस्तानविरुद्ध ८ चेंडूंत ४ धावा, नेदरलँड्सविरुद्ध १२ चेंडूंत ९ धावा आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १४ चेंडूंत ९ धावा ही ट्वेन्टी-२० विश्वचषकातील राहुलची कामगिरी भारतासाठी चिंतेचा विषय आहे. त्यामुळे आगामी सामन्यांत त्याला वगळण्याबाबत भारतीय संघाला विचार करावा लागणार आहे.

भारतीय संघाने गेल्या दशकभरात आपल्या क्षेत्ररक्षणाचा स्तर बराच उंचावला आहे, मात्र दक्षिण आफ्रिकेविरुद्ध क्षेत्ररक्षणात केलेल्या चुका भारताला महागात पडल्या. रविचंद्रन अश्विनने टाकलेल्या आफ्रिकेच्या डावातील १२व्या षटकात विराट कोहलीने मार्करमचा सोपा झेल सोडला. त्या वेळी आफ्रिकेला ५० चेंडूंत ७१ धावांची आवश्यकता होती. त्यापूर्वी भारताचा कर्णधार रोहित शर्माने मार्करमला धावचीत करण्याची संधी दवडली, तसेच १३व्या षटकात मिलरला धावचीत करण्यातही रोहित चुकला. या जीवदानांचा फायदा घेत मार्करम (५२) आणि मिलर (नाबाद ५९) यांनी अर्धशतके करीत आफ्रिकेला विजय मिळवून दिला.

गेली तीन-चार वर्षे लेगस्पिनर युजवेंद्र चहल ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये भारताचा प्रमुख फिरकीपटू आहे, पण गेल्या वर्षी संयुक्त अरब अमिराती येथे झालेल्या ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठीच्या भारतीय संघातून चहलला डावलण्यात आले होते. यंदाच्या ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठी त्याला भारतीय चमूत स्थान मिळाले, पण सामने खेळण्याची संधी मिळालेली नाही. पहिल्या दोन सामन्यांत ऑफ-स्पिनर अश्विन आणि डावखुरा फिरकीपटू अक्षर पटेलला अंतिम ११ जणांमध्ये स्थान मिळाले, तर पर्थच्या वेगवान खेळपट्टीवर झालेल्या आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यासाठी अश्विनच्या रूपात एकमेव फिरकीपटू भारताच्या संघात होता, मात्र अश्विनला फारसा प्रभाव पाडता आला नाही. अश्विनच्या गोलंदाजीवर मार्करमचा झेल सुटला, पण हा अपवाद वगळता अश्विनला आफ्रिकेच्या फलंदाजांना अडचणीत टाकता आले नाही. त्यामुळे आता अश्विनच्या जागी चहलला संधी दिली पाहिजे का, असा सवाल उपस्थित झाला आहे.

## कार्तिकच्या जागी पंतला संधी?




ट्वेन्टी-२० विश्वचषकात अनुभवी दिनेश कार्तिक विजयवीराची भूमिका चोख बजावेल अशी भारताला अपेक्षा होती, मात्र ही अपेक्षा अद्याप पूर्ण झालेली नाही. कार्तिकने यष्टिरक्षक म्हणून उत्तम कामगिरी केली असली तरी फलंदाजीत त्याला चमक दाखवता आलेली नाही. त्यामुळे 'अव्वल १२' फेरीतील उर्वरित दोन सामन्यांत कार्तिकच्या जागी पंतला निवडण्याचा भारतीय संघ विचार करू शकेल.

# हॉटेल कर्मचाऱ्यांकडून रूमचे व्हिडीओ शुटिंग

## विराटने व्यक्त केली नाराजी

**सिडनी : वृत्तसंस्था**



सध्या टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर आहे. या स्पर्धेत टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली चांगलाच फॉर्ममध्ये आहे. एकीकडे तो चांगला खेळ करीत असताना दुसरीकडे ऑस्ट्रेलियात ज्या हॉटेलमध्ये राहतोय तेथील त्याच्या खोलीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे. त्यामुळे विराटने नाराजी व्यक्त केली आहे.

विराट कोहलीने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. हा व्हिडीओ विराट राहात असलेल्या हॉटेलमधील खोलीचा असून यामध्ये विराटचे बूट, चष्मा, कपडे दिसत आहेत. 'आपल्या आवडत्या खेळाडूला पाहण्यासाठी तसेच त्याला भेटण्यासाठी चाहते आतूर असतात याची मला कल्पना आहे. याबाबत काहीही गैर नाही, मात्र हा व्हिडीओ पाहून मी नाराज झालो असून माझ्या खासगी आयुष्याबाबत मी चिंतीत आहे. माझ्या स्वत:च्या खोलीमध्येही माझा खासगीपणा अबाधित नसेल, तर मग मी खासगी जागेची अपेक्षा कुठे करावी? कोणाच्याही खासगी जीवनात हस्तक्षेप करणे चुकीचे असून मला हे मान्य नाही, असे म्हणत विराटने आपली नाराजी व्यक्त केली आहे. लोकांच्या खासगी आयुष्याचा आदर करा. त्यांच्या खासगी जीवनाचा मनोरंजनासाठी वापर करू नका, असे आवाहनही त्याने केले आहे.

दरम्यान, विराटने व्हिडीओ पोस्ट करीत नाराजी व्यक्त केल्यानंतर पत्नी अनुष्कासह जगभरातील क्रिकेटपटू तसेच अभिनेते-अभिनेत्रींनी कोणाच्याही खासगी जीवनात अशा प्रकारे हस्तक्षेप करणे चुकीचे असल्याचे मत व्यक्त केले आहे.

## कनिष्ठ जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत
# शंकर मुथूस्वामीला रौप्यपदक



**सँटेण्डर : वृत्तसंस्था**

भारताच्या शंकर मुथूस्वामीने स्पेनमधील 'बीडब्ल्यूएफ' कनिष्ठ जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत रौप्यपदक मिळवले. पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात शंकरला चायनीज तैपेईच्या कुओ कुआन लिनकडून पराभूत व्हावे लागले.

तमिळनाडूचा शंकर या स्पर्धेची अंतिम फेरी गाठणारा शंकर दुसरा भारतीय पुरुष खेळाडू ठरला होता. त्याने ४८ मिनिटे चाललेल्या लढतीत लिनकडून १४-२१, २०-२२ अशी हार पत्करली. यापूर्वी अपर्णा पोपट (१९९६), सायना नेहवाल (२००६) आणि सिरिल वर्मा (२०१५) यांनी प्रतिष्ठेच्या स्पर्धेत रौप्यपदक पटकाविले होते. अंतिम सामन्याच्या दोन्ही खेळाडूंमध्ये चांगली चुरस पहायला मिळाली. एकवेळ गेम १३-१३ असा बरोबरीत होता, मात्र लिनने आपला खेळ उंचावत गेम जिंकला आणि सामन्यात आघाडी घेतली. दुसऱ्या गेममध्ये लिनने ४-० अशी आघाडी घेतली. यानंतरही लिनने शंकरपेक्षा दर्जेदार खेळ करीत गेमसह सामना जिंकला.

## मुश्ताक अली ट्वेन्टी-२० स्पर्धेत उमेश यादव चमकला
# छत्तीसगडला नमवून विदर्भ उपांत्यपूर्व फेरीत



**कोलकाता : वृत्तसंस्था**

अनुभवी वेगवान गोलंदाज उमेश यादवचा (२७ धावांत ३ बळी) भेदक मारा आणि नंतर संजय रघुनाथने (५२ चेंडूंत ६३ धावा) केलेल्या अप्रतिम फलंदाजीच्या बळावर विदर्भाने सय्यद मुश्ताक अली ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेत छत्तीसगडवर पाच गडी आणि आठ चेंडू राखून विजय मिळविला. यासोबतच स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली.

छत्तीसगडने दिलेल्या ११२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या विदर्भाच्या रघुनाथने एक बाजू सांभाळली. त्याच्या अर्धशतकामुळे विदर्भाने १८.४ षटकांत ५ बाद ११२ धावसंख्येपर्यंत पोहचत विजय मिळविला. विदर्भाकडून अथर्व तायडे (४) आणि अपूर्व वानखडे (६) यांना चमक दाखवता आली नसली, तरीही रघुनाथने अप्रतिम खेळी केली. यात सात चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता.

त्यापूर्वी छत्तीसगडने २० षटकांत ९ बाद १११ धावसंख्येपर्यंत मजल मारली होती. प्रथम फलंदाजी करणाऱ्या छत्तीसगडकडून अमनदीप खरे (२५ धावा), कर्णधार हरप्रीत सिंग (२७) आणि अखिल हेरवाडकर (१९) वगळता इतर कोणत्याही फलंदाजांना फारशी चुणूक दाखवता आली नाही. उमेशसह यश ठाकूरच्या (२/२३) गोलंदाजीसमोर त्यांचा निभाव लागला नाही.

## इंग्लंडच्या महिला खेळाडूंसाठी निधी

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड क्रिकेट बोर्डाकडून (ईसीबी) देशातील महिला खेळाडूंच्या प्रगतीसाठी ३५ दशलक्ष पौंडचा निधी देण्यात आला आहे. इंग्लंड आणि वेल्समधील महिला खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर क्रिकेट खेळायची संधी मिळावी, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी ईसीबीकडून या निधीची घोषणा करण्यात आली आहे.

या निधीमुळे देशांतर्गत क्रिकेट खेळणाऱ्या महिलांचे सरासरी उत्पन्न २५ हजार पौंडपर्यंत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे तसेच इंग्लंडमध्ये २०२३पर्यंत व्यावसायिक क्रिकेट खेळणाऱ्या महिलांची संख्या १००पर्यंत जाणार आहे.

# सूर्या पुन्हा तळपला; जिंकली सर्वांची मने!

## माजी पाकिस्तानी खेळाडूंकडूनही कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत रविवारी पर्थमध्ये झालेल्या सामन्यात भारताचा दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पराभव झाला. या सामन्यात भारताचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादवने ४० चेंडूंत ६८ धावा केल्या. त्याने आपल्या खेळीत सहा चौकार आणि तीन षटकार मारले. त्याच्या या खेळीने सर्वांनी मने जिंकली. विशेष म्हणजे पाकिस्तानी माजी खेळाडूंनीही सूर्याचे कौतुक केले आहे.

सूर्याने मागील नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात २५ चेंडूत नाबाद ५१ धावांची अर्धशतकी खेळी साकारली होती. त्यानंतर त्याने पर्थ येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यातही अर्धशतकी खेळी केली. विशेष म्हणजे या सामन्यात त्याने खास कारनामा केला. आफ्रिकेविरुद्धच्या ६८ धावांच्या धडाकेबाज खेळीचे कौतुक करताना पाकिस्तानचा महान खेळाडू शोएब मलिक म्हणाला की, सूर्यकुमार यादव गोलंदाजाच्या डोक्यातील विचारांनी खेळू शकतो. गोलंदाज काय विचार करतो यावर तो फटके मारतो. त्याला माहिती आहे की गोलंदाज कशा प्रकारचे चेंडू टाकणार आहेत. इथली परिस्थिती वेगळी आहे, इथे असे शॉट्स खेळायला मन लागते. शोएबने असेही म्हटले की, त्याचे तंत्र इतके चांगले आहे की त्याला बाऊन्स नाही मिळाले तरी तो मागे खेळू शकतो.



पाकिस्तानचा माजी कर्णधार आणि अनुभवी खेळाडू मिसबाह-उल-हकने सूर्यकुमार यादवचे कौतुक करताना म्हटले की, तो सध्या शानदार फॉर्ममध्ये खेळत आहे. मैदानाच्या सर्व बाजूंना फटके मारण्याची त्याच्यात क्षमता आहे. त्याचवेळी पाकिस्तानचा महान माजी वेगवान गोलंदाज वसीम अक्रम म्हणाला की, सुर्यकुमार यादव इतर फलंदाजांपेक्षा काहीतरी वेगळा आहे. युवा खेळाडूंना त्याच्याकडून खूप काही शिकण्यासारखे आहे.











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com